दादा भगवान कथित

# भावना सुधारे जन्मोजन्म

( नऊ कलमे - सार, सर्व शास्त्रांचे )



Marathi

दादा भगवान कथित

# भावना सुधारे जन्मोजन्म

(नऊ कलमे - सार, सर्व शास्त्रांचे)

मूळ गुजराती संकलन : डॉ. नीरूबहन अमीन
मराठी अनुवाद : महात्मागण

**प्रकाशक** : **अजीत सी. पटेल**
**दादा भगवान विज्ञान फाउंडेशन**
1, वरूण अपार्टमेंट, 37, श्रीमाळी सोसायटी,
नवरंगपुरा पुलिस स्टेशनच्या समोर, नवरंगपुरा,
अहमदाबाद - 380009, Gujarat, India.
**फोन :** +91 79 3500 2100, +91 9328661166/77

**कॉपीराइट** : © Dada Bhagwan Foundation,
5, Mamta Park Society, B\h. Navgujarat College, Usmanpura,
Ahmedabad - 380014, Gujarat, India.
**Email :** info@dadabhagwan.org
**Tel** : +91 9328661166/77

**All Rights Reserved. No part of this publication may be shared, copied, translated or reproduced in any form (including electronic storage or audio recording) without written permission from the holder of the copyright. This publication is licensed for your personal use only.**

| | | | |
|---|---|---|---|
| **प्रथम आवृत्ति** | : | 3000 प्रती | ऑगस्ट 2013 |
| **रीप्रिंट** | : | 6000 प्रती | नोव्हेंबर 2014 ते ऑगस्ट 2015 |
| **नवीन रीप्रिंट** | : | 5000 प्रती | जुलै 2023 |

**भाव मूल्य** : 'परम विनय' आणि
'मी काहीच जाणत नाही', हा भाव!

**द्रव्य मूल्य** : 20 रुपये

**मुद्रक** : अंबा मल्टीप्रिंट
एच.बी.कापडिया न्यू हाइस्कूलच्या समोर,
छत्राल-प्रतापपुरा रोड, छत्राल,
ता. कलोल, जि. गांधीनगर-382729, गुजरात
**फोन :** +91 79 3500 2142

**ISBN/eISBN** : 978-93-82128-38-0

Printed in India

# त्रिमंत्र





नमो अरिहंताणं

नमो सिद्धाणं

नमो आयरियाणं

नमो ऊवज्झायाणं

नमो लोए सव्वसाहूणं

एसो पंच नमुक्कारो

सव्व पावप्पणासणो

मंगलाणं च सव्वेसिं

पढमं हवइ मंगलं ॥ १ ॥

ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥ २ ॥

ॐ नमः शिवाय ॥ ३ ॥

जय सच्चिदानंद





## दादा भगवान कोण?

जून 1958 संध्याकाळची अंदाजे सहाची वेळ, सुरत स्टेशनवर अलोट गर्दी होती. रेल्वेच्या प्लेटफॉर्म नंबर तीनच्या बाकावर बसलेल्या श्री अंबालाल मूळजीभाई पटेल रूपी देहमंदिरात नैसर्गिक स्वरूपात कित्येक जन्मांपासून व्यक्त होण्यासाठी आतूर असलेले 'दादा भगवान' संपूर्णपणे प्रकट झाले आणि निसर्गाने सर्जन केले अध्यात्माचे अद्‌भुत आश्चर्य! एका तासात त्यांना विश्वदर्शन लाभले! मी कोण? भगवंत कोण? जग कोण चालवित आहे? कर्म म्हणजे काय? मुक्ती कशाला म्हणतात? इत्यादी जगातील सर्व आध्यात्मिक प्रश्नांची रहस्ये संपूर्णपणे प्रकट झाली.

त्यांना प्राप्ती झाली तशी ते फक्त दोन तासात इतर मुमुक्षूनां सुद्धा आत्मज्ञानाची प्राप्ती करवित असत, त्यांच्या सिद्ध झालेल्या अद्‌भुत ज्ञान प्रयोगाद्वारे! त्याला अक्रम (क्रमविरहीत) मार्ग म्हटले जाते. क्रम म्हणजे पायरी पायरीने, क्रमाक्रमाने वर चढणे! अक्रम म्हणजे लिफ्ट मार्ग! शॉर्ट कट!

ते स्वत: प्रत्येकाला 'दादा भगवान कोण?' याबद्दलची फोड करून देताना म्हणायचे की, ''हे दिसतात ते 'दादा भगवान' नाहीत. हे तर 'ए.एम. पटेल' आहेत. आम्ही ज्ञानी पुरुष आहोत आणि आत प्रकट झाले ते दादा भगवान आहेत. दादा भगवान तर 'चौदालोकाचे' नाथ आहेत, ते तुमच्यात पण आहेत, सर्वांमध्ये आहेत! तुमच्यात अव्यक्त रुपात आहेत आणि 'येथे' माझ्या आत संपूर्णपणे व्यक्त झालेले आहेत! मी स्वत: भगवान नाही. माझ्या आत प्रकट झालेले 'दादा भगवान' यांना मी पण नमस्कार करतो.''

## आत्मज्ञान प्राप्तीची प्रत्यक्ष लींक

परम पूज्य दादा भगवान (दादाश्री) यांना 1958 मध्ये आत्मज्ञान प्रकट झाले. त्यानंतर 1962 ते 1988 पर्यंत देश-विदेश परिभ्रमण करून मुमुक्षुंना सत्संग आणि आत्मज्ञानाची प्राप्ती करवित असत.

दादाश्रींनी आपल्या हयातीतच आत्मज्ञानी पूज्य डॉ. नीरूबहन अमीन (नीरूमा) यांना आत्मज्ञान प्राप्त करवून देण्याची ज्ञानसिद्धी प्रदान केली होती. दादाश्रींच्या देहविलयानंतर नीरूमा त्यांच्याप्रमाणेच मुमुक्षुंना सत्संग व आत्मज्ञान प्राप्ती निमित्त भावाने करवित असत.

आत्मज्ञानी पूज्य दीपकभाई देसाई यांना सुद्धा दादाश्रींनी सत्संग करण्याची सिद्धी प्रदान केली होती. वर्तमानात पूज्य नीरूमांच्या आशीर्वादाने पूज्य दीपकभाई देश-विदेशात निमित्तभावाने आत्मज्ञान प्राप्ती करवित आहेत.

या आत्मज्ञान प्राप्तीनंतर हजारो मुमुक्षु संसारात राहून, सर्व जबाबदाऱ्या सांभाळत असताना सुद्धा आतून मुक्त राहून आत्मरमणतेचा अनुभव घेत आहेत.

# निवेदन

ज्ञानी पुरुष संपूज्य दादा भगवान यांच्या श्रीमुखातून अध्यात्म आणि व्यवहारज्ञाना संबंधीत जी वाणी निघाली, तिला रेकॉर्ड करून संकलन व संपादन करून पुस्तकाच्या रूपाने प्रकाशित केले जात आहे. विभिन्न विषायांवर निघालेल्या सरस्वतीचे अद्भुत संकलन ह्या पुस्तकात झाले आहे, जे नवीन वाचकांसाठी वरदान रूप सिद्ध होईल.

प्रस्तुत अनुवादामध्ये विशेष लक्ष ठेवलेले आहे की प्रत्येक वाचकाला दादाश्रींची प्रत्यक्ष वाणीच ऐकली जात आहे असा अनुभव व्हावा. याच कारणाने कदाचित काही ठिकाणी अनुवादाची वाक्य रचना मराठी व्याकरणानुसार त्रूटीपूर्ण जाणवेल, परंतु तिथे जर आशय समजून वाचण्यात आले तर अधिक लाभदायी होईल.

प्रस्तुत पुस्तकात काही ठिकाणी कंसात दर्शविलेले शब्द किंवा वाक्य दादाश्रींद्वारा बोलल्या गेलेल्या वाक्यांना अधिक स्पष्टतापूर्वक समजावण्यासाठी लिहिले गेले आहेत. तसेच काही ठिकाणी इंग्रजी शब्दांना मराठी अर्थाच्या रूपात ठेवले गेले आहेत. दादाश्रींच्या श्रीमुखातून निघालेले काही शब्द जसेच्या तसेच *इटालिक्स* मध्ये ठेवलेले आहेत, कारण त्या शब्दांसाठी मराठी भाषेत असे शब्द नाहीत की जे त्याचा पूर्ण अर्थ देऊ शकतील. तरी पण त्या शब्दांचे समानर्थी शब्द कंसात तसेच पुस्तकाच्या शेवटी पण दिले गेले आहेत.

ज्ञानींच्या वाणीला मराठी भाषेत यथार्थ रूपाने अनुवादित करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु दादाश्रींच्या आत्मज्ञानाचा आशय जसा आहे तसा तर आपल्याला गुजराती भाषेतच अवगत होईल. ज्यांना ज्ञानाचा गहन अर्थ समजून घ्यायचा असेल, ज्ञानाचे खरे मर्म समजायचे असेल त्यांनी ह्या हेतूने गुजराती भाषा शिकावी असा आमचा अनुरोध आहे. अनुवादासंबंधी उणीवांबद्दल आपले क्षमा प्रार्थी आहोत.

# दादा भगवान फाउन्डेशनची प्रकाशित मराठी पुस्तके

1. भोगतो त्याची चूक
2. एडजस्ट एवरीव्हेर
3. जे घडले तोच न्याय
4. संघर्ष टाळा
5. मी कोण आहे ?
6. क्रोध
7. चिंता
8. प्रतिक्रमण (सं, ग्रंथ)
10. भावना सुधारे जन्मोजन्म
11. कर्माचे विज्ञान
12. पाप-पुण्य
13. आई-वडील आणि मुलांचा व्यवहार (सं)
14. पति-पत्नीचा दिव्य व्यवहार (सं)
15. समजपूर्वक प्राप्त ब्रह्मचर्य (सं)
16. मानव धर्म
17. मृत्युवेळी, आधी आणि नंतर
18. सेवा-परोपकार
19. दान
20. त्रिमंत्र
21. वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामी
22. चमत्कार
23. सत्य-असत्याचे रहस्य
24. वाणी, व्यवहारात (सं)
25. पैशांचा व्यवहार (सं)
26. क्लेश रहित जीवन
27. निजदोष दर्शनाने... निर्दोष!
28. प्रेम
29. गुरू-शिष्य
30. अहिंसा
31. आप्तवाणी - 1 ते 5
36. आत्मसाक्षात्कार
37. जगत् कर्ता कोण ?
38. कर्माचा सिद्धांत

## हिन्दी

1. आत्मसाक्षात्कार
2. ज्ञानी पुरुष की पहचान
3. सर्व दु:खों से मुक्ति
4. कर्म का सिद्धांत
5. आत्मबोध
6. मैं कौन हूँ ?
7. पाप-पुण्य
8. भुगते उसी की भूल
9. एडजस्ट एवरीव्हेयर
10. टकराव टालिए
11. हुआ सो न्याय
12. चिंता
13. क्रोध
14. प्रतिक्रमण (सं, ग्रं)
16. दादा भगवान कौन ?
17. पैसों का व्यवहार (सं, ग्रं)
19. अंत:करण का स्वरूप
20. जगत कर्ता कौन ?
21. त्रिमंत्र
22. भावना से सुधरे जन्मोंजन्म
23. चमत्कार
24. प्रेम
25. समझ से प्राप्त ब्रह्मचर्य (सं, पू, उ)
28. दान
29. मानव धर्म
30. सेवा-परोपकार
31. मृत्यु समय, पहले और पश्चात्
32. निजदोष दर्शन से... निर्दोष
33. पति-पत्नी का दिव्य व्यवहार (सं)
34. क्लेश रहित जीवन
35. गुरु-शिष्य
36. अहिंसा
37. सत्य-असत्य के रहस्य
38. वर्तमान तीर्थकर श्री सीमंधर स्वामी
39. माता-पिता और बच्चों का व्यवहार (सं)
40. वाणी, व्यवहार में... (सं)
41. कर्म का विज्ञान
42. सहजता
43. आप्तवाणी - 1 से 9
52. आप्तवाणी - 13 (पूर्वार्ध व उत्तरार्ध)
54. आप्तवाणी - 14 (भाग-1 से 3)
57. ज्ञानी पुरुष (भाग-1)

**( सं - संक्षिप्त, ग्रं - ग्रंथ, पू - पूर्वार्ध, उ - उत्तरार्ध )**

★ **दादा भगवान फाउन्डेशन द्वारे गुजराती आणि इंग्रजी भाषेत सुद्धा बरीच पुस्तके प्रकाशित झाली आहेत. वेबसाइट www.dadabhagwan.org वर सुद्धा आपण ही सगळी पुस्तके प्राप्त करू शकता.**

★ **प्रत्येक महिन्यात हिन्दी, गुजराती आणि इंग्रजी भाषेत दादावाणी मेगेझीन प्रकाशित होत आहे.**

# संपादकीय

सकाळपासून संध्याकाळपर्यंत घरात, व्यवहारात किंवा बाहेर लोकांच्या तोंडून असे ऐकायला मिळतच असते की मला असे करायचे नसते तरी पण होऊनच जाते! असे करायचे असते पण ते होतच नाही! पुष्कळ भावना आहे, करण्याचा दृढ निश्चय सुद्धा आहे, प्रयत्न पण करत आहोत, परंतु तसे होत नाही!

सर्व धर्म उपदेशकांची साधकांसाठी कायमची तक्रार असते की आम्ही जे सांगतो ते तुम्ही पचवत नाही. श्रोते पण निराशेमुळे इतके गोंधळलेले असतात की इतके सर्व धर्माचे करून सुद्धा आचरणात का येत नाही? याचे रहस्य काय? ही चूक कशी सुधारायची?

परम पूज्य दादाश्रींनी या काळातील माणसांची कॅपेसिटी (क्षमता) पाहून त्यांच्या योग्यतेनुसार याचा उलगडा एका नव्याच पद्धतीने, अगदी वैज्ञानिक पद्धतीने केला आहे. पूज्य दादाश्रींनी वैज्ञानिक स्पष्टीकरण केले आहे की आचरण हा परिणाम आहे, इफेक्ट आहे आणि भाव हे कारण आहे, कॉज आहे. परिणामामध्ये सरळ-सरळ बदल करता येणारच नाही. बदल तर वैज्ञानिक पद्धतीनेच करता येईल. जर कारण बदलले तर परिणामात आपोआपच बदल होईल! आणि कारण बदलण्यासाठी आता ह्या जन्मात नव्याने भाव बदलावे लागतील आणि भाव बदलण्यासाठी दादाश्रींनी नऊ कलमे रूजविण्यास शिकवले आहे. तमाम शास्त्रे उपदेश देतात तरीही त्याचा परिणाम दिसत नाही, त्याचे सार पूज्य दादाश्रींनी नऊ कलमांद्वारे मुळापासून बदल करण्यासाठी चावीच्या रूपाने दिले आहे. त्याला अनुसरून लाखो लोकांनी ह्या जीवनालाच नाही, तर येणाऱ्या जन्मांनाही सुधारून घेतले आहे! खरे तर ह्या जन्मात बाह्य बदल होत नाही पण या नऊ कलमांची भावना रूजविल्यामुळे आतमधील नवीन कारणे मुळापासून बदलून जातात आणि जबरदस्त अंतरशांतीचा अनुभव होतो. दुसऱ्यांचे दोष पाहणे बंद होते, जे परमशांती प्राप्त करण्याचे परम कारण बनून जाते! आणि त्यातही कित्येकांनी तर पूर्वी नऊ कलमांसारख्याच

काही भावना रूजविल्या होत्या त्या आजच्या या अनुसंधानात परिणमित होऊन लगेचच त्यांच्या वर्तनात येतात.

कोणतीही सिद्धी प्राप्त करायची असेल तर त्यासाठी फक्त स्वतःच्या आत असलेल्या भगवंताजवळ सतत शक्ती मागत राहावी. ती निश्चितपणे फळ देतेच.

पूज्य दादाश्री स्वतःबद्दल सांगतात की 'ही नऊ कलमे आम्ही जीवनभर पाळत आलो आहोत, ही तर आमची पुंजी आहे. अर्थात हा आमचा रोजचा माल, (अनुभवज्ञान) आहे जो आता जाहीर केला आहे. मी, माझ्या आत ही नऊ कलमे की जी चाळीस, चाळीस वर्षांपासून निरंतर चालतच आहेत, ती शेवटी लोककल्याणासाठी जाहीर केली आहेत.'

कित्येक साधकांच्या मनात अशी मान्यता दृढ होऊन जाते की मी ह्या नऊ कलमांसारख्याच सर्व गोष्टी जाणतो आणि त्यानुसारच मी वागतो. परंतु जर त्यांना विचारले की, 'तुमच्यापासून कोणाला दुःख होते का?' त्यांच्या घरच्यांना किंवा जवळच्या नातेवाईकांना विचारले तर ते 'हो' म्हणतात. याचा अर्थ हाच की वास्तवात त्यांना यथार्थपणे समजलेलेच नाही. असे समजलेले कामी लागत नाही. खरे तर ज्ञानी पुरुषांनी स्वतःच्या जीवनात जे सिद्ध केले असेल आणि ते त्यांनी अनुभवगम्य वाणीद्वारे प्रदान केले असेल तरच क्रियाकारी होईल. अर्थात ती भावना ज्ञानी पुरुषांनी दिलेल्या डिजाईन (योजने)प्रमाणे असली पाहिजे, तरच उपयोगात येईल. आणि मोक्षमार्गात वेगाने प्रगती घडवून आणील! आणि शेवटी असे परिणाम येईल की स्वतःकडून कोणत्याही जीवाला किंचितमात्रही दुःख होणार नाही! इतकेच नाही, तर नऊ कलमांची भावना दररोज भावल्याने किती तरी दोष धुतले जातात आणि मोक्ष मार्गात पुढे प्रगती होत राहते.

**– डॉ. नीरूबहन अमीन**

# भावना सुधारे जन्मोजन्म

**( नऊ कलमे - सार, सर्व शास्त्रांचे )**

## ह्याच्याने तुटतील सर्व अंतराय

मी तुम्हाला एक पुस्तक वाचायला देतो. मोठे पुस्तक नाही, एक लहानसेच! ते जरा असेच वाचून बघा.

**प्रश्नकर्ता :** ठीक आहे.

**दादाश्री :** एकदा हे वाचा, पूर्ण वाचा. हे औषध देत आहे, ते वाचण्याचे औषध आहे. ही जी नऊ कलमे आहेत ती फक्त वाचायचीच आहेत, हे करण्याचे औषध नाही. बाकी तुम्ही जे करत आहात ते ठीकच आहे पण हे तर भावना रूजवण्याचे औषध आहे म्हणून हे जे देत आहोत ते वाचत राहा. यामुळे सर्व प्रकारचे अंतराय तुटतील.

म्हणून आधी एक-दोन मिनिटे ही नऊ कलमे वाचा.

**प्रश्नकर्ता :** नऊ कलमे...

1. हे दादा भगवान! मला, कोणत्याही देहधारी जीवात्म्याचा किंचितमात्रही अहम् दुभावणार (दुखावणार) नाही, दुभवविला जाणार नाही किंवा दुभविण्याप्रती अनुमोदन दिले जाणार नाही, अशी परम शक्ती द्या.

मला, कोणत्याही देहधारी जीवात्म्याचा किंचितमात्रही अहम् दुभावणार नाही अशी स्याद्वाद वाणी, स्याद्वाद वर्तन आणि स्याद्वाद मनन करण्याची परम शक्ती द्या.

2. हे दादा भगवान! मला, कोणत्याही धर्माचे किंचितमात्रही प्रमाण दुभावणार नाही, दुभवविले जाणार नाही किंवा दुभविण्याप्रती अनुमोदन दिले जाणार नाही, अशी परम शक्ती द्या.

मला, कोणत्याही धर्माचे किंचितमात्रही प्रमाण दुभावले जाणार नाही, अशी स्याद्वाद वाणी, स्याद्वाद वर्तन आणि स्याद्वाद मनन करण्याची परम शक्ती द्या.

3. हे दादा भगवान! मला, कोणत्याही देहधारी उपदेशक, साधू, साध्वी किंवा आचार्य, यांचा अवर्णवाद, अपराध, अविनय न करण्याची परम शक्ती द्या.

4. हे दादा भगवान! मला, कोणत्याही देहधारी जीवात्म्याप्रती किंचितमात्रही अभाव, तिरस्कार कधीही केला जाणार नाही, करविला जाणार नाही किंवा कर्त्याप्रति अनुमोदन दिले जाणार नाही, अशी परम शक्ती द्या.

5. हे दादा भगवान! मला, कोणत्याही देहधारी जीवात्म्याशी कधीही कठोर भाषा, तंतीली (टोचणारी) भाषा न बोलण्याची, न बोलवविण्याची किंवा बोलण्याप्रती अनुमोदन न देण्याची परम शक्ती द्या.

कोणी कठोर भाषा, तंतीली भाषा बोलले तरी मला मृदु-ऋजु भाषा बोलण्याची परम शक्ती द्या.

6. हे दादा भगवान! मला, कोणत्याही देहधारी जीवात्म्याप्रती, स्त्री-पुरुष किंवा नपुंसक, कोणताही लिंगधारी असो, तर त्यांच्या संबंधी

किंचितमात्र पण विषयविकार संबंधी दोष, इच्छा, चेष्टा-चाळे किंवा विचार संबंधी दोष न करण्याची, न करविण्याची किंवा कर्त्याप्रती अनुमोदन न देण्याची परम शक्ती द्या.

मला निरंतर निर्विकार राहण्याची परम शक्ती द्या.

7. हे दादा भगवान! मला, कोणत्याही रसात लुब्ध न होण्याची शक्ती द्या. समरसी आहार घेण्याची परम शक्ती द्या.

8. हे दादा भगवान! मला, कोणत्याही देहधारी जीवात्म्याचा प्रत्यक्ष किंवा परोक्ष, जिवंत किंवा मृत्यू पावलेल्या, कोणाचाही किंचितमात्रही अवर्णवाद, अपराध, अविनय केला जाणार नाही, करविला जाणार नाही किंवा कर्त्याप्रती अनुमोदन दिले जाणार नाही, अशी परम शक्ती द्या.

9. हे दादा भगवान! मला जगत् कल्याण करण्याचे निमित्त बनण्याची परम शक्ती द्या, शक्ती द्या, शक्ती द्या.

(एवढेच तुम्ही दादा भगवानांजवळ मागत राहायचे. ही दररोज यंत्रवत् वाचण्याची वस्तू नाही, अंतरात ठेवण्याची वस्तू आहे. ही दररोज उपयोगपूर्वक भावना रूजविण्याची गोष्ट आहे. एवढ्या पाठात सर्व शास्त्रांचे सार येऊन जाते.)

**दादाश्री :** शब्दन् शब्द वाचून काढला ना?

**प्रश्नकर्ता :** हो, सर्व नीट वाचले.

## अहम् दुखावणार नाही...

**प्रश्नकर्ता :** 1. हे दादा भगवान! मला, कोणत्याही देहधारी जीवात्म्याचा किंचितमात्रही अहम् दुभावणार (दुखावणार) नाही, दुभवविला जाणार नाही किंवा दुभविण्याप्रती अनुमोदन दिले जाणार नाही, अशी परम शक्ती द्या.

मला, कोणत्याही देहधारी जीवात्म्याचा किंचितमात्रही अहम् दुभावणार नाही अशी स्याद्‌वाद वाणी, स्याद्‌वाद वर्तन आणि स्याद्‌वाद मनन करण्याची परम शक्ती द्या. हे समजवा.

**दादाश्री :** कोणाचा अहम् दुखावणार नाही यासाठी आपण स्याद्‌वाद वाणी मागत आहोत. अशी वाणी आपल्यात हळूहळू उत्पन्न होईल. मी जी वाणी बोलत आहे ना, ती मला भावना रूजविल्याच्या फळ स्वरूपात प्राप्त झाली आहे.

**प्रश्नकर्ता :** पण यात कोणाचाही अहम् दुखावायचा नाही याचा अर्थ असा तर नाही ना की कोणाचा अहम् पोसावा?

**दादाश्री :** नाही, तसा अहम् पोसायचा नाही. हे तर अहम् दुखावायचा नाही, असे असावे. मी म्हणेन की हे काचेचे ग्लास फोडू नका. याचा अर्थ असा नाही की तुम्ही काचेचे ग्लास सांभाळा. ते ग्लास आपल्या जागेवर सुरक्षितच आहेत, म्हणून त्यांना फोडू नका. ते जर फुटत असतील तर तुम्ही तुमच्या निमित्ताने फोडू नका. आणि अशी तुम्हाला फक्त भावनाच करायची आहे की माझ्याकडून कोणत्याही जीवाला किंचितमात्र दुःख होऊ नये, त्याचा अहंकार भग्न होऊ नये, असे असावे. त्याला उपकारी मानत आहोत.

**प्रश्नकर्ता :** व्यापार-धंद्यात समोरच्याचा अहम् दुखावला जाणार नाही असे नेहमी शक्य होत नाही. कोणाचा तरी अहम् दुखावला जातोच.

**दादाश्री :** त्याला अहम् दुखावला असे म्हणत नाहीत. अहम् दुखावला म्हणजे काय की तो बिचारा काही बोलायचा प्रयत्न करत असेल आणि आपण म्हणालो 'गप्प बस, तू काही बोलूच नको.' असे म्हणून त्याचा अहंकार दुखावू नये. आणि व्यापार-धंद्यात अहम् दुखावला म्हणजे तिथे खरोखर अहम् दुखावला जात नाही, मन दुखावले जाते.

**प्रश्नकर्ता :** पण अहम् ही काही चांगली गोष्ट नाही, मग तो दुखावला तर काय हरकत आहे?

**दादाश्री :** तो स्वतःच आता अहंकार स्वरूप आहे, म्हणून त्याला दुखावायचे नाही. तो जे काही करतो त्याला मीच करत आहे असे मानतो. म्हणून दुखावायचे नाही. घरातसुद्धा तुम्ही कोणावर रागावू नका. कोणाचाही अहंकार दुखावणार नाही अशा प्रकारे वागा. कोणाचाही अहंकार दुखावू नये. अहंकार दुखावला तर तो माणूस तुमच्यापासून दुरावत जातो. मग पुन्हा तो तुम्हाला भेटणार नाही. आपण असे कोणाला बोलू नये की 'तू बेकार आहेस नी तू असा आहेस, तू तसा आहेस.' असे पाडून बोलू नये. हो, रागावू शकता. रागवण्यास हरकत नाही, पण काहीही झाले तरी त्याचा अहंकार मात्र दुखावू नये. डोक्याला मार लागला तर हरकत नाही, पण त्याच्या अहंकाराला मार लागायला नको. कोणाचाही अहंकार भग्न करू नये.

कोणी मजूर असेल, तर त्याचाही तिरस्कार करू नये. तिरस्काराने त्याचा अहंकार दुखावला जातो. आपल्याला त्याच्याशी काम नसेल तर आपण त्याला म्हणावे की, 'भाऊ, आता माझे तुझ्याकडे काम नाही.' आणि जर त्याचा अहंकार दुखावला जात नसेल तर पाच रूपये देऊनही त्याला मोकळे करावे. पैसे तर मिळतील पण त्याचा अहम् दुखावला जाता कामा नये. नाही तर तो वैर बांधेल, जबरदस्त वैर बांधेल! आपले कल्याण होऊ देणार नाही, अडथळा निर्माण करेल.

ही तर फार गहन गोष्ट आहे. आणि जरी तुमच्याकडून कोणाचा अहंकार दुखावला गेला तर येथे आमच्याजवळ (या कलमाप्रमाणे) शक्ती मागावी. म्हणजे जे घडले, त्यापासून स्वतःचा अभिप्राय वेगळा ठेवला, म्हणून त्याची जबाबदारी जास्त नाही. कारण आता त्याचा 'अभिप्राय' बदललेला आहे. अहंकार दुखावण्याचा जो 'अभिप्राय' होता, तो आता अशी मागणी केल्यामुळे वेगळा होऊन गेला.

**प्रश्नकर्ता :** अभिप्रायापासून तो वेगळा झाला म्हणजे काय?

**दादाश्री :** 'दादा भगवानांना' तर समजले ना, की आता ह्याला बिचाऱ्याला कोणाचाही अहम् दुखावण्याची इच्छा नाही. त्याची स्वत:ची इच्छा नाही तरीसुद्धा होऊन जाते. याउलट जगाच्या लोकांकडून तर जाणूनबुजून होत असते. अर्थात हे कलम बोलण्यामुळे काय होते की आपला अभिप्राय बदलतो. म्हणून आपण त्यांच्यापासून मुक्त झालो.

अर्थात ही शक्तीच मागायची आहे. तुम्हाला काही करायचे नाही, फक्त शक्तीच मागायची आहे. याला (मुद्दाम) अमलात आणायचे नाही.

**प्रश्नकर्ता :** शक्ती मागायची गोष्ट बरोबर आहे. पण आपण असे काय केले पाहिजे की जेणेकरून दुसऱ्यांचा अहम् दुखावला जाणार नाही?

**दादाश्री :** नाही, तसे काही करायचे नाही. ह्या कलमाप्रमाणे तुम्हाला फक्त बोलायचे, बस! दुसरे काही करायचे नाही. सध्या तुमच्याकडून जो अहम् दुखावला जात आहे ते फळ (डिस्चार्जमध्ये) आलेले आहे. आता जे घडले ते तर 'डिसाईड' होऊन गेले आहे. ते काही थांबवता येणार नाही. त्याला बदलणे ही तर डोकेफोड आहे. परंतु हे कलम बोलल्यामुळे आपली जबाबदारी राहत नाही.

**प्रश्नकर्ता :** आणि हे अगदी मनापासून बोलले पाहिजे.

**दादाश्री :** हे सर्व तर अगदी मनापासूनच केले पाहिजे. आणि जो कोणी करतो ना, तो खोट्या मनाने करत नाही, खरोखर मनापासूनच करतो. पण यात स्वत:चा अभिप्राय वेगळा झाला, हे तर सर्वात मोठे विज्ञानच आहे.

या प्रमाणे करायचे नाही, तुम्हाला तर फक्त ही नऊ कलमे म्हणायची आहेत. शक्तीच मागायची आहे की 'दादा भगवान' मला

शक्ती द्या. मला ही शक्ती पाहिजे. आणि ती शक्ती तुम्हाला प्राप्त होते आणि तुमची जबाबदारी मिटते. हे जग कोणते विज्ञान शिकवते? तर 'असे नका करू.' लोक काय म्हणतात की, अरे बाबा, मला करायचे नसते तरी पण होऊन जाते. म्हणून तुमचे ज्ञान आम्हाला 'फिट' (अनुकूल) होत नाही. हे जे तुम्ही म्हणता, त्याने पुढचे बंद होत नाही आणि आजचे थांबतही नाही, अर्थात दोन्ही बाजूने नुकसान होते. म्हणजे 'फिट' होईल असे असायला हवे.

## भाव प्रतिक्रमण तत्क्षणीच

**प्रश्नकर्ता :** माझ्याकडून जेव्हा समोरच्याचा अहंकार दुखावला जातो, तेव्हा मला असे वाटते की हा तर माझा अहंकार बोलला ना?

**दादाश्री :** नाही तसा अर्थ काढायची गरज नाही. आपली जागृती काय म्हणते? आपला हा मोक्षमार्ग म्हणजे अंतर्मुखी मार्ग आहे! निरंतर आतल्या जागृतीतच राहायचे आणि समोरच्याचा अहम् दुखावला गेला असेल तर लगेच त्याचे प्रतिक्रमण करून घ्यायचे, हेच आपले काम. तुम्ही तर एवढी सारी प्रतिक्रमणे करतात त्यात एक अधिक! आमच्याकडूनही जर कधी कोणाचा अहम् दुखावला गेला असेल तर आम्हीसुद्धा प्रतिक्रमण करतो.

म्हणून सकाळच्या प्रहरी असे बोलायचे की, माझ्या 'मन-वचन-कायेने कोणत्याही जीवाला किंचितमात्रही दुःख न होवो' असे पाच वेळा बोलून मगच घराबाहेर पडावे. आणि मग जे दुःख झाले असेल ते आपल्या इच्छेविरुद्ध झाले आहे, त्याचे मग संध्याकाळी प्रतिक्रमण करावे.

प्रतिक्रमण म्हणजे काय? डाग पडल्याबरोबर लगेचच धुऊन टाकणे. मग काही हरकत नाही, मग कसलीच भानगड नाही. प्रतिक्रमण

कोण करत नाही? तर ज्यांना (अज्ञानरूपी) बेहोशी आहे, ती माणसे प्रतिक्रमण करत नाहीत, नाहीतर मी ज्यांना ज्ञान दिले आहे, ती माणसे कशी बनली आहेत? विचक्षण पुरुष बनले आहेत, क्षणोक्षणी विचार करणारे, बावीस तीर्थंकरांचे अनुयायी विचक्षण होते, ते 'शूट ऑन साईट' प्रतिक्रमण करत असत. दोष झाला की लगेच 'शूट'! आणि आता हल्लीची माणसे तसे करू शकणार नाहीत, म्हणून भगवंतांनी रायशी-देवशी, (रात्री झालेल्या दोषांचे सकाळी प्रतिक्रमण, दिवसा झालेल्या दोषांचे रात्री प्रतिक्रमण) पाक्षिक, आणि पर्युषणमध्ये संवत्सरी प्रतिक्रमण, असे सर्व करायला सांगितले आहे.

## स्याद्वाद वाणी, वर्तन, मनन...

**प्रश्नकर्ता :** मला, कोणत्याही देहधारी जीवात्म्याचा किंचितमात्रही अहम् दुभावणार नाही अशी स्याद्वाद वाणी, स्याद्वाद वर्तन आणि स्याद्वाद मनन करण्याची परम शक्ती द्या. हे जरा समजवा.

**दादाश्री :** स्याद्वादचा अर्थ असा की सर्व जण कोणत्या भावनेने आणि कोणत्या 'व्ह्यू पॉइंट' (दृष्टीकोन)ने म्हणत आहेत ते आपण समजून घ्यायला हवे.

**प्रश्नकर्ता :** समोरच्याचा 'व्ह्यू पॉइंट' समजणे याला स्याद्वाद म्हणायचे का?

**दादाश्री :** समोरच्याचा 'व्ह्यू पॉइंट' समजणे आणि त्याप्रमाणे व्यवहार करणे, याचे नाव स्याद्वाद. त्याच्या 'व्ह्यू पॉइंट'ला दुःख होणार नाही अशा प्रकारे व्यवहार करावा. चोराच्या 'व्ह्यू पॉइंट'ला दुःख होणार नाही अशा प्रकारे जर तुम्ही बोललात, तर तो झाला स्याद्वाद!

हे आम्ही जे बोलतो ते मुसलमान असो की पारसी असो, सर्वांना सारखेच समजते. कोणाचेही प्रमाण दुखावले जात नाही की 'पारसी

असे आहेत आणि स्थानकवासी असे आहेत.' म्हणजेच कोणालाही दु:ख होता कामा नये.

**प्रश्नकर्ता :** येथे जर कोणी चोर बसला असेल, त्याला आपण सांगू की चोरी करणे हे चांगले नाही, तर त्याचे मन तर दुखावेलच ना?

**दादाश्री :** नाही, असे बोलू नये. आपण त्याला सांगावे की, 'चोरी करण्याचे फळ असे येते. तुला योग्य वाटत असेल तर कर.' असे सांगावे. म्हणजे योग्य पद्धतीने बोलले पाहिजे. तर तो ऐकण्यास तयारही होईल. नाही तर तो ऐकणारच नाही, आणि तुमचे शब्द वाया जातील. आपले बोलणे वाया जाईल आणि उलट तो वैर धरील की हे मोठे आले शिकवणारे! असे होता कामा नये.

लोक म्हणतात की, चोरी करणे हा गुन्हा आहे. पण चोराला वाटते की चोरी करणे हा माझा धर्म आहे. आमच्याजवळ कोणी चोराला घेऊन आले तर आम्ही त्याच्या खांद्यावर हात ठेऊन त्याला खाजगीत विचारतो की 'भाऊ हा धंदा तुला आवडतो का? पसंत आहे का?' मग तो त्याची सर्व हकीगत सांगेल. आमच्याजवळ त्याला भीती वाटणार नाही. मनुष्य भीतीमुळे खोटे बोलतो. मग आम्ही त्याला समजावून सांगू की 'हे जे तू करतोस त्याची जबाबदारी काय असते? त्याचे फळ काय येते? त्याची तुला जाणीव आहे का?' 'तो चोरी करतो' असे तर आमच्या मनातही नसते. असे जर कधी आमच्या मनात असेल तर त्याच्यावर त्याचा परिणाम होईल. प्रत्येक जण आपापल्या धर्मातच असतो. कोणत्याही धर्माचे प्रमाण दुखावले जाणार नाही. याला म्हणतात स्याद्वाद वाणी. स्याद्वाद वाणी ही संपूर्ण असते. प्रत्येकाची प्रकृती भिन्न भिन्न असते, पण तरीही स्याद्वाद वाणी कोणाच्याही प्रकृतीला अपाय करत नाही.

**प्रश्नकर्ता :** स्याद्‌वाद मनन म्हणजे काय?

**दादाश्री :** स्याद्‌वाद मनन म्हणजे विचारांमध्ये, विचार करण्यातही कोणत्याही धर्माचे प्रमाण दुखावले जाता कामा नये. वर्तनात तर नाहीच परंतु विचारात सुद्धा होता कामा नये. बाहेर बोलाल ते वेगळे पण मनातसुद्धा असे चांगले विचार असले पाहिजेत की समोरच्याचे प्रमाण दुखावले जाणार नाही. कारण मनात जे (वाईट) विचार येतात ते समोरच्यापर्यंत पोहोचतात. त्यामुळेच तर लोकांची तोंडे फुगलेली असतात. कारण तुमचे विचार त्यांच्यापर्यंत पोहोचून परिणाम करतात.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे कोणाबद्दल वाईट विचार आले तर त्याचे प्रतिक्रमण करायला हवे?

**दादाश्री :** हो, नाही तर त्याचे मन दुखावेल. आणि प्रतिक्रमण केले तर त्याचे मन जरी दुखावलेले असेल तरीही ते सुधारेल. कोणासाठीही वाईट किंवा उलट-सुलट विचार करू नये. असे काहीच करू नये. 'सब सबकी संभालो,' आपापले सांभाळा, बस! दुसरे काही करण्याची गरज नाही.

## धर्माचे प्रमाण दुखावणार नाही...

**प्रश्नकर्ता :** 2. हे दादा भगवान! मला, कोणत्याही धर्माचे किंचितमात्रही प्रमाण दुभावणार नाही, दुभवविले जाणार नाही किंवा दुभविण्याप्रती अनुमोदन दिले जाणार नाही, अशी परम शक्ती द्या.

मला, कोणत्याही धर्माचे किंचितमात्रही प्रमाण दुभावले जाणार नाही, अशी स्याद्‌वाद वाणी, स्याद्‌वाद वर्तन आणि स्याद्‌वाद मनन करण्याची परम शक्ती द्या.

**दादाश्री :** कोणाचेही प्रमाण दुखावले जाऊ नये. कोणीही चुकीचे आहे, असे वाटायला नको. 'एक', ही संख्या म्हटली जाते की नाही?

**प्रश्नकर्ता :** हो, म्हटली जाते.

**दादाश्री :** तर 'दोन' पण ही संख्या म्हटली जाते की नाही?

**प्रश्नकर्ता :** हो, म्हटली जाते.

**दादाश्री :** तर 'शंभर' संख्यावाले काय म्हणतील? 'आमचे खरे आणि तुमचे खोटे.' परंतु असे म्हणू शकत नाही. सर्वांचे खरे आहे, 'एक'चे 'एक'च्या अनुसार, 'दोन'चे 'दोन'च्या अनुसार, खरे आहे. म्हणजे सगळ्यांचे (दृष्टिकोन) स्वीकारणे, त्याचे नाव स्याद्‌वाद. एक वस्तू त्याच्या गुणधर्मात असेल पण आपण त्यातील अमुकच गुणांचा स्वीकार केला आणि बाकीच्या गुणांचा स्वीकार केला नाही, तर ते चुकीचे ठरेल. स्याद्‌वाद म्हणजेच प्रत्येकाचे त्याच्या प्रमाणानुसार. 360 डिग्री पूर्ण झाल्यावर तर सर्वांचे खरे म्हटले जाईल पण त्याच्या डिग्रीपर्यंत त्याचे खरे आणि ह्याच्या डिग्रीपर्यंत ह्याचे खरे.

म्हणून कुठलाही धर्म खोटा आहे असे आपण बोलू शकत नाही. प्रत्येक धर्म खरा आहे, खोटा नाही. आपण कोणालाही खोटा आहे, असे तर म्हणूच शकत नाही ना! तो त्याचा धर्म आहे. मांसाहार करत असेल, त्याला आपण चुकीचे आहे असे कसे म्हणू शकतो?! तो म्हणेल, मांसाहार करणे हा तर माझा धर्म आहे. तर आपण त्याला मनाई करू शकत नाही. ती त्याची मान्यता आहे, त्याची बिलीफ आहे. आपण कोणाची बिलीफ तोडू शकत नाही. परंतु जे शाकाहारी कुटुंबात जन्मले आहेत ते जर मांसाहार करत असतील तर आपण त्यांना सांगितले पाहिजे की 'भाऊ, ही चांगली गोष्ट नाही.' तरीही त्याला तसेच करायचे असेल तर मात्र आपण त्याला विरोध करू शकत नाही. आपण समजावून सांगायला हवे की असे करणे हेल्पफूल (सहाय्यक) नाही.

स्याद्‌वाद म्हणजे कोणत्याही धर्माचे प्रमाण दुखावायचे नाही. जेवढ्या प्रमाणात ते सत्य असेल तेवढ्या प्रमाणात त्याला सत्य सांगा

आणि जेवढ्या प्रमाणात असत्य असेल तेवढ्या प्रमाणात त्याला असत्य पण सांगा. याचाच अर्थ प्रमाण दुखावले नाही. ख्रिश्चियन प्रमाण, मुस्लिम प्रमाण, कोणत्याही धर्माचे प्रमाण दुखावू नये. कारण सर्व धर्म 360 डिग्रीतच सामावले जातात. रियल इज द सेंटर आणि ऑल दीज आर रिलेटिव्ह व्ह्यूज (रियल हे केन्द्र आहे आणि इतर सर्व रिलेटिव्ह-सापेक्ष दृष्टीकोन आहेत). सेंटरवाल्यांसाठी रिलेटिव्ह व्ह्यूज सर्वच समान असतात. भगवंताचा स्याद्वाद म्हणजे कोणालाही किंचितमात्र पण दु:ख होऊ नये, मग जरी कुठलाही धर्म असो!

अर्थात हा स्याद्वाद मार्ग असा असतो. प्रत्येकाच्या धर्माचा स्वीकार करावा लागतो. समोरचा दोन थोबाडीत मारेल ते सुद्धा आपण स्वीकारले पाहिजे. कारण संपूर्ण जग निर्दोष आहे. दोषी दिसत आहे, ते तुमच्या दोषामुळे दिसत आहे. बाकी, जग दोषी नाहीच. ते तुमची बुद्धी दोषी दाखविते की ह्याने खोटे केले.

## अवर्णवाद, अपराध, अविनय...

**प्रश्नकर्ता :** 3. हे दादा भगवान! मला, कोणत्याही देहधारी उपदेशक, साधू, साध्वी किंवा आचार्य, यांचा अवर्णवाद, अपराध, अविनय न करण्याची परम शक्ती द्या.

**दादाश्री :** काहीही करून जसे आहे तसे न सांगता त्याहून उलटेच सांगणे याला अवर्णवाद म्हणतात! जसे आहे तसे तर नाहीच परंतु त्यापेक्षा अगदीच उलटे. जसे आहे तसे बोलणे, वाईटाला वाईट बोलणे आणि चांगल्याला चांगले बोलणे, याला अवर्णवाद म्हणत नाहीत. पण सर्व चुकीचेच सांगणे, याला अवर्णवाद म्हटले जाते. कोणत्याही माणसात काही तरी चांगले असतेच ना! आणि थोडे वाईटही असते. पण त्याचे सर्वच वाईट आहे असे सांगणे, त्याला अवर्णवाद म्हटले जाते. 'या बाबतीत जरा असा आहे, पण इतर बाबतीत तो खूप चांगला आहे.' असे म्हटले पाहिजे.

कोणाच्याही बाबतीत आपण जे काही जाणत असू, त्याचे काही गुण जाणत असू, तरी पण त्याहून सर्व विरुद्धच सांगणे, म्हणजे जे गुण त्याच्यात नाहीत त्या गुणांबद्दल बोलणे ते सर्व अवर्णवाद आहे. वर्णवाद म्हणजे जसे आहे तसे बोलणे आणि अवर्णवाद म्हणजे जसे नाही तसे बोलणे. ही तर भयंकर विराधना म्हटली जाते, खूप मोठी विराधना म्हटली जाते. इतर साधारण माणसांच्या बाबतीत असे बोलणे त्याला निंदा म्हटले जाईल परंतु महान पुरुषांच्या बाबतीत असे बोलणे त्याला अवर्णवाद म्हटले जाते. महान पुरुष म्हणजे जे अंतर्मुख झाले आहेत ते. महान पुरुष म्हणजे व्यवहारात जे मोठे आहेत ते नाही, प्रेसिडन्ट (राष्ट्रपती) असतील त्यांच्यासाठी नाही, पण जे अंतर्मुख झाले आहेत अशा महान पुरुषांचा अवर्णवाद करणे ही फार मोठी जोखीम आहे!! विराधनेहूनही अधिक आहे.

**प्रश्नकर्ता :** उपदेशक, साधू, आचार्य यांच्यासाठी असे म्हटले आहे ना?

**दादाश्री :** हो, त्या सर्वांबद्दलच. जरी ते योग्य मार्गावर असोत किंवा नसोत, त्यांना ज्ञान असो किंवा नसो, ते आपण पाहायचे नाही, ते महावीर भगवंतांचे आराधक आहेत ना? मग ते काहीही करोत, खरे किंवा खोटे, पण ते महावीरांच्या नावावर करत आहेत ना? त्यामुळे त्यांचा अवर्णवाद करू नये.

**प्रश्नकर्ता :** अवर्णवाद आणि विराधनेमध्ये फरक काय?

**दादाश्री :** विराधना करणारा तर उलटा जातो, खाली घसरतो, अधोगतीत जातो आणि अवर्णवाद करणाऱ्याने जर नंतर प्रतिक्रमण केले तर बाधा येत नाही, त्याचे सर्व रेग्युलर होऊन जाते. कोणाचा अवर्णवाद केला, पण नंतर प्रतिक्रमण केले तर स्वच्छ होऊन जाते (दोष धुतला जातो).

**प्रश्नकर्ता :** अविनय आणि विराधना या विषयी जरा समजवा.

**दादाश्री :** अविनय हे विराधनेमध्ये गणले जात नाही. अविनय ही जरा खालची स्टेज आहे पण विराधना तर अक्षरशः त्यांच्या विरुद्ध गेला असे म्हटले जाईल. अविनय म्हणजे तर मला काही देणेघेणे नाही. विनय न करणे, म्हणजेच अविनय.

**प्रश्नकर्ता :** अपराध म्हणजे काय?

**दादाश्री :** आराधना करणारा मनुष्य वर चढतो आणि विराधना करणारा खाली घसरतो. परंतु जर अपराध करत असेल, तर दोन्ही बाजूंनी मार खातो. अपराध करणारा स्वतः तर पुढे जात नाही पण इतर कोणालाही पुढे जाऊ देत नाही. त्याला अपराधी म्हणतात.

**प्रश्नकर्ता :** आणि विराधनेतसुद्धा कोणाला पुढे जाऊ देत नाही ना?

**दादाश्री :** तरी विराधना करणारा बरा. कारण कोणाला कळले तर तो त्याला सांगेल ना की, 'काय पाहून तुम्ही या दिशेने चालत आहात? या दिशेला अहमदाबाद कसे असू शकते?' तेव्हा मग तो कदाचित मागे फिरेलही पण अपराधी तर मागे फिरणारच नाही आणि पुढेही जाणार नाही. विराधना करणारा तर उलटे चालतो म्हणून पडतो ना!

**प्रश्नकर्ता :** पण विराधना करणाऱ्याला मागे फिरण्याची संधी तर असतेच ना?

**दादाश्री :** हो, त्याला तर मागे फिरण्याची संधी असतेच ना!

**प्रश्नकर्ता :** अपराध करणाऱ्याला परत मागे फिरण्याची संधी असते का?

**दादाश्री :** तो तर परत फिरतच नाही आणि पुढेही सरकत नाही. त्याचा काही नियमच नाही. तो पुढेही सरकत नाही आणि मागेही जात नाही. जेव्हा पाहावे तेव्हा तिथल्या तिथेच, त्याला म्हणतात अपराधी.

**प्रश्नकर्ता :** अपराधाची व्याख्या काय आहे ?

**दादाश्री :** विराधना ही इच्छेशिवाय होते आणि अपराध इच्छापूर्वक होत असतो.

**प्रश्नकर्ता :** तो कसा, दादाजी ?

**दादाश्री :** हट्टाला पेटला असेल तर अपराध करून बसतो. त्याला समजते की इथे विराधना करणे योग्य नाही, तरी पण विराधना करतो. समजत असूनही विराधना केली तर ती अपराधात मोडते. विराधना करणारा सुटेल, पण अपराध करणारा मात्र सुटणार नाही. ज्याचा खूप तीव्र अहंकार असतो, तो अपराध करून बसतो. म्हणून स्वतःच स्वतःला सांगावे लागते की, 'भाऊ, तू तर वेडा आहेस, उगाचच (अहंकाराची) अशी पॉवर घेऊन फिरतोस. लोकांना तर हे माहीत नाही पण मी जाणतो ना की तू कसा आहेस. तू अगदी घनचक्करच आहेस.' आपल्यालाच असा उपाय करावा लागतो. प्लस आणि मायनस (वजा-बाकी) करावे लागते, फक्त गुणाकार केला तर कसे चालेल ? म्हणून आपण भागाकार करावा. बेरीज-वजाबाकी निर्सगाच्या अधीन आहे, आणि गुणाकार-भागाकार मनुष्याच्या हाती आहे. ह्या अहंकारामुळे जर साताने गुणले जात असेल तर साताने भागून टाकले पाहिजे म्हणजे निःशेष होईल !

**प्रश्नकर्ता :** कोणाची निंदा केली तर ती कशात मोडते ?

**दादाश्री :** निंदा ही विराधनेत मोडते. पण प्रतिक्रमण केल्याने धुतली जाते. ती अवर्णवादासारखी आहे. म्हणून तर आम्ही म्हणतो ना की कोणाचीही निंदा करू नका. तरीही लोक मागून निंदा करतात. अरे,

निंदा कधीच करू नये. हे वातावरण सारे परमाणूंनी भरलेले आहे. म्हणून त्याच्यापर्यंत सर्व पोहोचते. कोणासाठी एक शब्द देखील बेजबाबदारीपूर्वक बोलू नये आणि बोलायचेच असेल तर काही चांगले बोलावे. कीर्ती गा, अपकीर्ती करू नका.

कोणाच्या निंदेत पडायचे नाही. स्तुती करता येत नसेल तर हरकत नाही, पण निंदेत पडूच नका. मी म्हणतो की निंदा करण्यात तुमचा काय फायदा? त्यात तर खूप नुकसान आहे. या जगात जबरदस्त नुकसान जर कशाने होत असेल तर ते निंदा केल्यामुळे होते. म्हणून कोणाचीही निंदा करण्याचे काम आपल्याकडून घडायला नको.

निंदा अशी गोष्टच आपल्याकडे नाही. हे तर काय खरे आणि काय खोटे हे समजण्यासाठीच आम्ही बोलत आहोत.! भगवंतांनी काय सांगितले? खोट्याला खोटे जाण आणि खऱ्याला खरे जाण. पण खोटे जाणते वेळी त्याच्यावर किंचितमात्र द्वेष नसावा आणि खरे जाणते वेळी त्याच्यावर किंचितमात्र राग (आसक्ती, मोह) नसावा. खोट्याला खोटे जाणले नाही तर खऱ्याला खरे जाणणे शक्य नाही. म्हणून आम्ही सविस्तर सांगत आहोत. ज्ञानींकडूनच ज्ञान समजते.

## अभाव, तिरस्कार करू नये...

**प्रश्नकर्ता :** 4. हे दादा भगवान! मला, कोणत्याही देहधारी जीवात्म्याप्रती किंचितमात्रही अभाव, तिरस्कार कधीही केला जाणार नाही, करविला जाणार नाही किंवा कर्त्याप्रती अनुमोदन दिले जाणार नाही अशी परम शक्ती द्या.

**दादाश्री :** हो, बरोबर आहे. आपल्या मनात कोणासाठीही अभाव झाला असेल, समजा तुम्ही ऑफिसात बसले असाल आणि तिथे कोणी आले आणि तुम्हाला त्याच्याबद्दल अभाव झाला, तिरस्कार झाला, तर

तुम्ही मनात विचार करून त्यासाठी पश्चात्ताप केला पाहिजे की असे होता कामा नये.

या तिरस्कारापासून कधीही सुटका होत नाही. त्यात तर निव्वळ वैरच बांधले जाते. कोणाचा जराही तिरस्कार होत असेल, अरे, निर्जीव वस्तूचा जरी तिरस्कार होत असेल तरी तुम्ही सुटणार नाही. कोणाचाही जरा सुद्धा तिरस्कार करून चालणार नाही. आणि जोपर्यंत कोणाबद्दलही तिरस्कार असेल तोपर्यंत वीतराग होता येणार नाही. आणि वीतराग तर व्हावेच लागेल, तरच तुमची सुटका होईल!

## कठोर-तंतीली भाषा न बोलण्याची...

**प्रश्नकर्ता :** 5. हे दादा भगवान! मला, कोणत्याही देहधारी जीवात्म्याशी कधीही कठोर भाषा, *तंतीली* (टोचणारी) भाषा न बोलण्याची, न बोलवविण्याची किंवा बोलण्याप्रती अनुमोदन न देण्याची परम शक्ती द्या.

कोणी कठोर भाषा, *तंतीली* भाषा बोलले तर मला मृदु-ऋजु भाषा बोलण्याची परम शक्ती द्या.

**दादाश्री :** कठोर भाषा बोलू नये. जर कोणाशीही कठोरभाषा बोलली गेली आणि जर त्याला वाईट वाटले तर आपण प्रत्यक्ष जाऊन त्याला म्हणावे की, 'भाऊ, माझी चूक झाली, मी माफी मागतो' आणि प्रत्यक्षात म्हणता आले नाही तर मनात पश्चात्ताप करावा की, असे बोलायला नको.

**प्रश्नकर्ता :** आणि पुन्हा असे बोलू नये, असा विचार केला पाहिजे.

**दादाश्री :** हो, असा विचार केला पाहिजे आणि पश्चात्तापही केला पाहिजे. पश्चात्ताप केला तरच तसे बोलणे बंद होईल. नाही तर आपोआप बंद होणार नाही. फक्त बोलण्याने बंद होत नाही.

**प्रश्नकर्ता :** मृदु, ऋजु भाषा म्हणजे काय?

**दादाश्री :** ऋजु म्हणजे सरळ आणि मृदु म्हणजे नम्रतापूर्ण. अत्यंत नम्रतापूर्ण असेल तेव्हा मृदु म्हटली जाते. आपण सरळ आणि नम्रतापूर्ण वाणी बोलायला हवी आणि तशी शक्ती मागावी, असे करता-करता ती शक्ती येईल. तुम्ही कठोर भाषा बोललात आणि मुलाला वाईट वाटले तर त्याचा पश्चात्ताप करावा. आणि मुलाला सुद्धा सांगावे की 'मी माफी मागतो. पुन्हा कधी असे बोलणार नाही', हाच वाणी सुधारण्याचा मार्ग आहे आणि 'हे' एकच कॉलेज आहे.

**प्रश्नकर्ता :** तर कठोर भाषा व *तंतीली* भाषा आणि मृदुता व ऋजुता, यांच्यात काय फरक आहे?

**दादाश्री :** कित्येक लोक कठोर भाषा बोलतात, 'तू नालायक आहेस. बदमाश आहेस, चोर आहेस.' असे असे शब्द बोलतात की जे आपण कधी ऐकलेही नसतील! असे कठोर वचन ऐकल्यावर आपण स्तब्ध होऊन जातो. ही कठोर भाषा जरासुद्धा प्रिय वाटत नाही. उलट मनात अनेक प्रश्न उठतात की हे सर्व काय आहे? कठोर भाषा ही अहंकारी असते.

आणि *तंतीली* भाषा म्हणजे काय? तर स्पर्धेत जसा *तंत* असतो ना? 'पाहा मी कसा छान स्वयंपाक केला आणि त्याला तर येतच नाही.' अशा प्रकारे मनात *तंत* निर्माण होतो. स्पर्धा उत्पन्न होते. अशी *तंतीली* भाषा (ऐकण्यास) खूप वाईट असते.

कठोर आणि *तंतीली* भाषा बोलू नये. भाषेचे सर्व दोष या दोन शब्दात येऊन जातात. म्हणून रिकामा वेळ मिळाला की 'दादा भगवानांकडून' आपण शक्ती मागत राहावी कर्कश बोलले जात असेल तर त्या विरोधात शक्ती मागावी की मला शुद्ध वाणी बोलण्याची शक्ती द्या, स्याद्वाद वाणी बोलण्याची शक्ती द्या, मृदु-ऋजु भाषा बोलण्याची

शक्ती द्या. असे मागतच राहायचे. स्याद्‌वाद वाणी म्हणजे कोणालाही दु:ख होणार नाही अशी वाणी.

## निर्विकार राहण्याची शक्ती द्या

**प्रश्नकर्ता :** 6. हे दादा भगवान! मला, कोणत्याही देहधारी जीवात्म्याप्रती, स्त्री-पुरुष किंवा नपुंसक, कोणताही लिंगधारी असो, तर त्यांच्या संबंधी किंचितमात्र पण विषयविकार संबंधी दोष, इच्छा, चेष्टा-चाळे किंवा विचार संबंधी दोष न करण्याची, न करविण्याची किंवा कर्त्याप्रती अनुमोदन न देण्याची अशी परम शक्ती द्या.

मला निरंतर निर्विकार राहण्याची परम शक्ती द्या.

**दादाश्री :** आपली दृष्टी बिघडली तर त्वरितच आत तुम्ही 'चंदुभाईला' (वाचकांनी चंदुभाऊच्या जागी स्वत:ला समजायचे) सांगावे की असे करता कामा नये. आपल्याला हे शोभत नाही. आपण खानदानी क्वॉलिटीचे (गुणवाले) आहोत. जशी आपली बहीण असते, तशी ती दुसऱ्याची बहीण आहे. आपल्या बहिणीवर जर कोणी वाईट नजर केली तर आपल्याला किती दु:ख होईल! तसे दुसऱ्यालाही दु:ख होईल की नाही? म्हणून आपल्याला असे शोभत नाही. म्हणजे दृष्टी बिघडली तर पश्चात्ताप करावा.

**प्रश्नकर्ता :** चेष्टा-चाळे याचा अर्थ काय?

**दादाश्री :** देहाने होणाऱ्या सर्व क्रिया, ज्याचा फोटो काढता येईल, ती सर्व चेष्टा म्हटली जाते. तुम्ही मस्करी करता ती चेष्टा सर्व म्हटली जाते. असे (कुत्सीत) हसता ती चेष्टा म्हटली जाते.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे कोणाचे हसे उडविणे, कोणाची टिंगल करणे, ही सर्व चेष्टा म्हटली जाते?

**दादाश्री :** हो, अशा अनेक प्रकारच्या चेष्टा आहेत.

**प्रश्नकर्ता :** तर या विषयविकारा संबंधी चेष्टा कोणत्या प्रकारच्या असतात?

**दादाश्री :** विषयविकाराच्या बाबतीत देह ज्या ज्या क्रिया करतो, त्याचा फोटो घेता येतो, म्हणून त्यास चेष्टा-चाळे म्हणतात. जी क्रिया देहाने झाली नसेल ती चेष्टा म्हटली जात नाही. कधी कधी इच्छा होतात, मनात विचार येतात, परंतु चेष्टा झालेली नसते. विचारांचे दोष ते मनाचे दोष!

'मला निरंतर निर्विकार राहण्याची शक्ती द्या.' इतके तुम्ही 'दादां' जवळ मागा, 'दादा' तर दानेश्वर आहेत.

## रसामध्ये लुब्धपणा न होवो...

**प्रश्नकर्ता :** 7. हे दादा भगवान! मला, कोणत्याही रसात लुब्ध न होण्याची शक्ती द्या. समरसी आहार घेण्याची परम शक्ती द्या.

**दादाश्री :** जेवताना तुम्हाला अमुकच भाजी, उदाहरणार्थ टॉमेटोचीच भाजी आवडते, ती तुम्हाला पुन्हा पुन्हा आठवत राहते, तर त्यास लुब्धपणा म्हटला जातो. टॉमेटो खाण्यास हरकत नाही, परंतु पुन्हा त्याची आठवण यायला नको. नाही तर आपली सर्व शक्ती लुब्धतेत जात राहील. म्हणून आपण सांगावे की 'जे येईल ते मला मान्य आहे.' कुठल्याही प्रकारची लुब्धता नसावी. ताटात जे जेवण वाढले गेले, आमरस आणि चपाती वाढली तर आमरस-चपाती निवांतपणे खावी. त्यात काही हरकत नाही, पण जे काही आले त्याचा स्वीकार करावा, दुसरे काही आठवू नये.

**प्रश्नकर्ता :** मग हे समरसी म्हणजे काय?

**दादाश्री :** समरसी म्हणजे पुरणपोळी, डाळ-भात, भाजी सर्वच खावे, परंतु फक्त पुरणपोळीच भरभरून खात राहायचे नाही.

काही लोक मिठाई खायचे सोडून देतात. तेव्हा ती मिठाई त्यांच्यावर दावा मांडेल, ती म्हणेल माझ्याबद्दल तुला काय तक्रार आहे? चूक रेड्याची आणि दंड गुराख्याला! अहो, जीभेची काय चूक? चूक रेड्याची आहे. रेड्याची चूक म्हणजेच अज्ञानतेची चूक.

**प्रश्नकर्ता :** पण समरसी आहार म्हणजे काय? यात भावाची समानता कशा प्रकारे असते?

**दादाश्री :** तुमच्या समाजात ज्या प्रकारचे जेवण बनवतात, ते तुमच्या समाजातील लोकांना समरसी वाटेल असेच बनवतात परंतु तेच जेवण जर दुसऱ्या समाजाच्या लोकांना जेवायला दिले तर त्यांना ते समरसी वाटणार नाही. कारण तुम्ही तिखट कमी खाणारे लोक. समरसी आहार प्रत्येक ज्ञातिचा वेगवेगळा असतो. समरसी आहार म्हणजे टेस्टी, चविष्ट भोजन. तिखट जास्त नाही, अमुक जास्त नाही, सर्व वस्तू योग्य प्रमाणात घातलेल्या असतात. कोणी म्हणतो, 'मी फक्त दूध पिऊन पडून राहीन.' याला समरसी आहार म्हणता येत नाही. समरसी म्हणजे सहा प्रकारचे रस चांगल्या प्रकारे एकत्र करून खाणे, चविष्ट बनवून खाणे. दुसरे काही कडू खाल्ले जात नसेल तर कारले खा, कंटोळी खा, मेथी खा. म्हणजे कडू सुद्धा पाहिजे. कडू खात नाही, म्हणून तर सर्व रोग होतात. आणि मग 'क्विनाईन' (कडू औषध) प्यावे लागते! तो रस कमी घेतात म्हणूनच हा त्रास होतो ना! म्हणजेच सर्व रस घेतले पाहिजेत.

**प्रश्नकर्ता :** याचा अर्थ समरसी आहार घेण्यासाठी शक्ती मागायची की, 'हे दादा भगवान! मी समरसी आहार घेऊ शकेल अशी मला शक्ती द्या.

**दादाश्री :** हो, तुम्ही अशी शक्ती मागा. तुमची भावना काय आहे? समरसी आहार घेण्याची, तुमची भावना झाली तो तुमचा पुरुषार्थ. आणि मी शक्ती देतो म्हणजे तुमचा पुरुषार्थ झाला मजबूत!

**प्रश्नकर्ता :** कोणत्याही रसात लुब्धपणा नसावा, तेही बरोबर आहे?

**दादाश्री :** हो, म्हणजे त्याला असे तर वाटताच कामा नये की मला आंबटशिवाय दुसरे काही आवडत नाही. कित्येक म्हणतात की, 'मला गोड खाल्ल्याशिवाय जमतच नाही' तेव्हा तिखटाने काय गुन्हा केला? कित्येक म्हणतात की, 'मला गोड आवडतच नाही.' 'फक्त तिखटच पाहिजे.' याला समरसी म्हणता येणार नाही. समरसी म्हणजे सर्व स्वीकार्य. कमी-जास्त प्रमाणात पण सर्व काही 'एक्सेप्टेड' (स्वीकार्य).

**प्रश्नकर्ता :** समरसी आहार आणि ज्ञान, या दोन्हींचे काही कनेक्शन आहे का? ज्ञान जागृतीसाठी जो आहार समरसी नसेल तो घेऊ नये का?

**दादाश्री :** समरसी आहारासाठी तर असे आहे ना की आपल्या (ज्ञानप्राप्त) महात्म्यांसाठी तर आता 'व्यवस्थित शक्ती'चे ज्ञान आहे म्हणून आपल्याकडे वाद राहिलाच नाही. हे तर इतर लोकांसाठी सांगितले आहे. आणि आपल्या महात्म्यांच्या लक्षात तर हे येतेच ना की शक्य तेवढा समरसी आहार घेतला पाहिजे. मीच सांगतो की 'भाऊ जरा तिखट आणा बघू.' आणि मग असेही सांगतो की हे मी खोकल्याचे औषध घेत आहे! मग ज्याचा औषधपचार केला जातो त्यालाही 'मी' पाहतो, कारण प्रकृती आहे ना!

## प्रकृतीचे गुणाकार-भागाकार

**प्रश्नकर्ता :** म्हणजे प्रकृती समरसी असली पाहिजे, असे?

**दादाश्री :** प्रकृती म्हणजे काय? तेरा ने गुणलेल्या वस्तूला तेरानेच भागले तरच प्रकृती पूर्ण होते. आता कोणी सतराने गुणलेल्या वस्तूला

तेराने भागले तर काय होईल? म्हणून मी वेगळ्याच प्रकारचा गुणाकार केला.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे तेराने गुणले असेल त्याला तेरानेच भागायचे. असेच ना?

**दादाश्री :** तसे केले तरच नि:शेष होईल ना!

**प्रश्नकर्ता :** त्याचे उदाहरण काय बरे?

**दादाश्री :** प्रकृती म्हणजे पूर्वी जे भाव केले होते, ते कोणत्या आधारावर केले? तर पूर्वी जो काही आहार खाल्ला त्या आधारावर भाव केले. म्हणजे ते भाव तेरा ने गुणले. आता त्या भावांना घालवायचे असतील तर त्यांना तेराने भागून टाकावे म्हणजे ते नि:शेष होऊन जातील. आणि मग पुन्हा नव्याने भाव उत्पन्न होऊ देत नाही, म्हणून ते खाते बंदच होऊन गेले. आता नवीन इच्छा नाहीत म्हणून खाते बंद होऊन गेले. खाते सील केले पाहिजे.

## ...तेथे प्रकृतीची शून्यता

**प्रश्नकर्ता :** शुद्धात्म्याचे ज्ञान तर दिले. आता या प्रकृतीची शून्यता प्राप्त करण्यासाठी ही नऊ कलमे म्हटली, तर त्याने मदत होते का?

**दादाश्री :** हो, मदत तर होतेच, जेवढ्याने गुणले तेवढ्यानेच भागावे. मला डॉक्टर सांगतात, 'हे खात जा.' मी सांगितले. 'डॉक्टर, ही गोष्ट दुसऱ्या रुग्णांना सांगा. आमचा हा गुणाकार वेगळ्याच प्रकारचा आहे आणि त्यांनी मला भागाकार करायला सांगितले तर ते कसे जमेल?'

**प्रश्नकर्ता :** तुम्ही तर उलट तिखट अधिक प्रमाणात घेऊन भागाकार करता?

**दादाश्री :** तिखट घेते वेळी मी सर्वांना सांगतो की मी हे खोकल्याचे औषध घेत आहे अणि खोकला आल्यावर दाखवतो सुद्धा की हे बघा, झाला ना खोकला?

**प्रश्नकर्ता :** पण भागाकार कुठे केला?

**दादाश्री :** तोच भागाकार. तिखट घेतले नसते तर भागाकार पूर्ण झाला नसता.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे प्रकृतीमध्ये पूर्वी जे भरले होते, ते आता पूर्ण करायचे?

**दादाश्री :** हो, पूर्ण करायचे.

या नीरूबेनला मी सांगतो, 'तुम्ही हो म्हणालात तर मी सुपारी खाईन.' पण सुपारी खाताना सांगतो की हे खोकल्याचे औषध आहे. आणि कित्येक वेळा त्या मनाई करतात तेव्हा नाही खात आणि मग म्हणाल्या की 'घ्या', तेव्हा मी घेतो. मग खोकला होतो. तसे पाहिले तर मी सुपारी खात नाही. मला कुठल्याही वस्तूची सवय नाही. पण आत माल भरलेला आहे त्यामुळे खाल्ले जाईल ना?

आमचे हे 'अक्रम विज्ञान' आहे! हे सर्व तर मागच्या सवयी पडल्या आहेत, त्यामुळे असे होत असते. म्हणून ही शक्ती मागा. मग जरी लुब्ध आहार घेतला तरी हरकत नाही पण ह्या कलमानुसार बोलण्याने तुम्ही त्या करारापासून मुक्त होता.

**प्रश्नकर्ता :** आपली जी प्रकृती आहे, तिला जर गुणले तर ती वाढत जाईल. तिला भागले पाहिजे. प्रकृतीला प्रकृतीने भागले पाहिजे, हे जरा समजवा ना.

**दादाश्री :** म्हणजे हे कलम वारंवार बोलत राहिल्याने प्रकृतीचा

भागाकार होत राहतो, आणि ती कमी होत जाते. हे कलम म्हटले नाही तर (प्रकृतीरूपी) रोपटे आपोआप उगवतच राहील. पण हे वारंवार बोलत राहिल्याने कमी होत जाईल. हे बोलत राहिल्याने प्रकृतीचा जो गुणाकार झालेला आहे तो मिटेल. आणि आत्म्याचा गुणाकार होईल. अर्थात प्रकृतीचा भागाकार होईल, जेणेकरून आत्म्याला पुष्टी मिळेल. जेव्हा वेळ मिळेल तेव्हा रात्रंदिवस ही नऊ कलमे बोलत जा! सवड मिळाल्यावर म्हणा. आम्ही तर तुम्हाला सर्व औषधे देतो, सर्वकाही समजावतो, मग तुम्हाला जसे करायचे असेल तसे करा...

## प्रत्यक्ष-परोक्ष, जिवंत-मृत्यू पावलेल्यांना...

**प्रश्नकर्ता :** 8. हे दादा भगवान! मला, कोणत्याही देहधारी जीवात्म्याचा प्रत्यक्ष किंवा परोक्ष, जिवंत किंवा मृत्यु पावलेल्या, कोणाचाही किंचितमात्रही अवर्णवाद, अपराध, अविनय केला जाणार नाही, करविला जाणार नाही किंवा कर्त्याप्रती अनुमोदन दिले जाणार नाही, अशी परम शक्ती द्या.

**दादाश्री :** अवर्णवाद म्हणजे एखाद्या माणसाची बाहेर समाजामध्ये अब्रू चांगली असेल, मान असेल, कीर्ती असेल, तरी देखील त्याच्याबद्दल उलट बोलून त्याला बेअब्रू करणे, त्यास अवर्णवाद म्हणातात.

**प्रश्नकर्ता :** यात आपण मृत्यू पावलेल्यांची पण क्षमायाचना करतो, तर त्यांना जे काही संबोधन करतो, ते त्यांच्यापर्यंत पोहोचते का?

**दादाश्री :** त्यांच्यापर्यंत पोहोचवायचे (हा उद्देश) नाही. तो माणूस मरून गेला आहे आणि तुम्ही आज त्याच्या नावाने शिव्या घातल्या, तर तुम्ही भयंकर दोषात पडाल. असे आम्हाला सांगायचे आहे. म्हणून आम्ही मनाई करतो की मेलेल्या व्यक्तीसाठी उलट-सुलट बोलू नका.

म्हणजे यात पोहोचण्या न पोहचण्याचा प्रश्नच नाही. कुणी वाईट माणूस असेल आणि चुकीची कामे करून मेला असेल, तरी पण मागाहून त्याच्याबद्दल वाईट बोलू नये.

रावणाच्या बाबतीतही वाईट बोलू नये. कारण तो अजून देहधारी आहे (दुसऱ्या जन्मात). म्हणून त्याला 'फोन' पोहोचतो. 'रावण असा होता आणि तसा होता' बोललो तर ते त्याला पोहोचेल.

तुमच्या कोणी नातेवाईकाचा मृत्यू झाला असेल आणि लोक त्याची निंदा करत असतील, तर तुम्ही त्यांच्यासोबत हो ला हो करून निंदेत पडू नका. आणि जर तसे केले तर नंतर तुम्हाला पश्चात्ताप केला पाहिजे की असे होता कामा नये. एखाद्या मृतकासाठी असे बोलणे हा भयंकर गुन्हा आहे. लोक मेलेल्याही सोडत नाहीत. असे करतात की नाही लोक? पण असे करू नये. हे आम्ही सांगू इच्छित आहोत. यात खूप मोठी जोखीम आहे.

त्यावेळेस पूर्वीच्या 'ओपिनियन' (अभिप्राया)मुळे असे बोलले जाते. म्हणून हे कलम म्हणत असाल आणि मग जर असे बोलले गेले तर दोष लागणार नाही. हा हुक्का पीत जाऊ आणि बोलत जाऊ की 'प्यायचा नाही, पाजायचा नाही आणि पिण्याप्रती अनुमोदन दिले जाणार नाही अशी शक्ती द्या.' तर त्यामुळे सर्व करार संपतील. नाहीतर पुद्गलचा स्वभाव कोलांटी मारण्याचा आहे. म्हणून ही भावना करायला हवी.

## जगत् कल्याण करण्याची शक्ती द्या

**प्रश्नकर्ता :** ९. हे दादा भगवान! मला जगत् कल्याण करण्याचे निमित्त बनण्याची परम शक्ती द्या, शक्ती द्या, शक्ती द्या. आम्ही जर ही कल्याणाची भावना केली तर ती कशा प्रकारे काम करेल?

**दादाश्री :** तुमचे शब्द असे निघतील की समोरच्या व्यक्तीचे काम होऊन जाईल.

**प्रश्नकर्ता :** आपण पौद्‌गलिक कल्याणाची की 'रियल'च्या (आत्म्याच्या) कल्याणाची गोष्ट करत आहात?

**दादाश्री :** पुद्‌गल नाही, आपल्याला तर 'रियल'कडे जाण्याचीच गरज आहे. मग 'रियल'च्या सहाय्याने पुढचे (मोक्षापर्यंतचे) काम होऊन जाईल. हे 'रियल' प्राप्त झाले तर तर 'रिलेटिव्ह' प्राप्त होणारच. संपूर्ण जगाचे कल्याण करा अशी भावना रूजवायची. हे फक्त गाण्यापुरते गायचे नाही, तर अशी भावना रूजवायची आहे. लोक तर गाण्यासाठी गातात, जसे श्लोक म्हणतात तसे.

**प्रश्नकर्ता :** अगदीच रिकामे बसून राहण्यापेक्षा अशी भावना भावली तर ते उत्तमच म्हटले जाईल ना?

**दादाश्री :** अति उत्तम. वाईट भाव तर निघून गेले! ह्यातील जेवढे झाले तेवढे खरे, तेवढी तरी कमाई झाली!

**प्रश्नकर्ता :** या भावनांना मेकॅनिकल भावना म्हणू शकतो का?

**दादाश्री :** नाही, मेकॅनिकल कसे म्हणता येईल? मेकॅनिकल तर, तुम्ही अति प्रमाणात, स्वत:चे लक्षही नसेल आणि असेच बोलत राहिलात तर ते मेकॅनिकली झाले म्हणायचे.

## यात काहीच करायचे नसते

**प्रश्नकर्ता :** यात लिहिले आहे की 'मला शक्ती द्या, शक्ती द्या.' तर असे वाचल्यामुळे आम्हाला शक्ती मिळेल का?

**दादाश्री :** नक्कीच! हे 'ज्ञानी पुरुषाचे' शब्द आहेत!! पंतप्रधानांची

चिठ्ठी असेल आणि येथील एका व्यापाऱ्याची चिठ्ठी असेल, त्यात फरक असेल की नाही?! आता का बोलत नाही? हो, ही 'ज्ञानी पुरुषांची' गोष्ट आहे. यात बुद्धी वापरली तर माणूस वेडा होईल. ह्या गोष्टी तर बुद्धी पलीकडील आहेत.

**प्रश्नकर्ता :** परंतु अमलात आणण्यासाठी त्यात लिहिले आहे, तसे करावे तर लागेल ना?

**दादाश्री :** नाही, हे फक्त वाचायचेच आहे. मग अमलात आपणहूनच येईल. म्हणून हे नऊ कलमांचे पुस्तक तुम्ही सोबतच ठेवायचे आणि रोजच वाचायचे. तुम्हाला त्यातील सर्व ज्ञान समजेल. हे रोज वाचता वाचता त्याची प्रॅक्टिस होऊन जाईल. तुम्ही तद्रूप होऊन जाल. आज तुम्हाला हे कळणार नाही की यात मला काय फायदा झाला! पण हळूहळू तुम्हाला यथार्थपणे समजेल.

ही शक्ती मागितल्याने मग त्याचे फळ येऊन वर्तनात दिसू लागेल. म्हणून तुम्ही 'दादा भगवानां'जवळ सर्व शक्ती मागायच्या. आणि 'दादा भगवानांकडे' अपार, अनंत शक्ती आहे, जे मागाल ते मिळेल अशी! म्हणजे हे मागितल्याने काय होईल?

**प्रश्नकर्ता :** शक्ती मिळेल!

**दादाश्री :** हो, ही कलमे पालन करण्यासाठी शक्ती मिळेल, आणि त्यानंतर पालन करता येईल, असेच काही पाळता येणार नाही. म्हणून तुम्ही सतत ही शक्ती मागत राहा. दुसरे काही करायचे नाही, जसे लिहिले आहे तसे पटकन होत नाही, आणि ते होणार पण नाही. तुमच्याने जेवढे होईल तेवढे तुम्ही जाणा की एवढे होत आहे आणि एवढे होत नाही, त्याची क्षमा मागावी. आणि त्याचबरोबर ही शक्ती मागावी, म्हणजे शक्ती मिळेल.

## शक्ती मागून काम साध्य करा

एका भाऊला मी सांगितले की, ह्या नऊ कलमांत सर्व काही सामावले आहे. यात काही बाकी ठेवले नाही. 'तुम्ही ही नऊ कलमे रोज वाचत जा!' तेव्हा ते म्हणाले 'पण तसे जमणार नाही.' मी सांगितले, 'अहो, मी करायला सांगतच नाही, मग जमणार नाही असे का म्हणता?' तुम्ही तर एवढेच म्हणायचे की, 'हे दादा भगवान, मला शक्ती द्या.' शक्ती मागा एवढेच सांगत आहे. त्यावर ते म्हणाले 'मग तर मजा येईल!' लोकांनी तर करायला शिकवले आहे.

नंतर त्यांनी मला विचारले, 'ही शक्ती कोण देणार?' मी सांगितले, 'शक्ती मी देईन.' तुम्ही मागाल त्या शक्ती मी तुम्हाला द्यायला तयार आहे. तुम्हाला तर मागताच येत नाही, म्हणून तर मला शिकवावे लागते की अशा प्रकारे शक्ती मागा. शिकवावे नाही का लागत? पाहा ना, सर्व शिकवलेच आहे ना? हे मीच शिकवलेले आहे ना? तेव्हा ते समजून गेले, आणि मग म्हणाले की एवढे तर सहज जमेल, एवढ्यात सर्व आले!

**प्रश्नकर्ता :** प्रथम तर हीच शंका येते की शक्ती मागितली तर मिळेल की नाही?

**दादाश्री :** हीच शंका खोटी ठरत असते. आता तुम्ही ही शक्ती मागत राहता ना! म्हणजे ती शक्ती तुमच्या आत उत्पन्न झाल्यावर ती शक्तीच कार्य करवून घेईल. तुम्हाला करायचे नाही. तुम्ही कराल तर इगोइजम (अहंकार) वाढेल. 'मी करायला जातो पण होत नाही' असे होईल. म्हणून ती शक्ती मागा.

**प्रश्नकर्ता :** ह्या नऊ कलमात आपण शक्ती मागतो की असे केले जाऊ नये, करविले जाऊ नये, आणि करणाऱ्याला अनुमोदन दिले जाऊ नये, म्हणजे याचा अर्थ असा आहे की भविष्यात असे होऊ नये,

यासाठी आपण शक्ती मागतो की मग आपले मागचे केलेले सर्व (दोष) धुतले जावेत म्हणून मागतो?

**दादाश्री :** मागचे सर्व धुतले जाईल आणि शक्ती उत्पन्न होईल. शक्ती तर आहेच, पण दोष धुतले गेल्याने ती शक्ती व्यक्त होते. शक्ती तर आहेच पण ती व्यक्त झाली पाहिजे. म्हणूनच दादा भगवानांची कृपा मागत आहोत, आपले दोष धुतले जातील तेव्हा शक्ती व्यक्त होईल.

**प्रश्नकर्ता :** हे सर्व वाचले तेव्हा कळले की ही तर एक जबरदस्त गोष्ट आहे. सामान्य माणसालाही जर हे समजले तर त्याचे जीवन सुखमय होईल.

**दादाश्री :** हो. खरे तर, आजपर्यंत समजण्यासारखी गोष्ट त्याला ऐकायला मिळालीच नाही. पहिल्यांदाच स्पष्ट समजण्यासारखी ही गोष्ट मिळाली आहे. आता ही मिळाली म्हणजे निराकरण होईल.

या नऊ कलमांमधून आपोआप जितक्याही कलमांचे तुमच्याकडून पालन होत असेल त्याला हरकत नाही. परंतु जर पालन होत नसेल तर त्यासाठी मनात खेद ठेऊ नका. तुम्हाला फक्त इतकेच म्हणायचे की, मला शक्ती द्या. त्यामुळे शक्ती मिळत जाईल. आत शक्ती जमा होत जाईल. नंतर आपोआपच काम होईल. तुम्ही शक्ती मागाल तर ही सर्व नऊ कलमे सेट होऊन जातील! तात्पर्य हेच की फक्त बोललात तरी खूप झाले. तुम्ही बोलले म्हणजे शक्ती मागितली आणि मागितली म्हणून शक्ती प्राप्त झाली.

## भावनेमुळे भाव शुद्धी

**प्रश्नकर्ता :** आपण तर सांगता ना की हुक्का पीत जातो पण आत वेगळे चालत असते की प्यायचे नाही, पाजायचे नाही, किंवा पिण्याप्रति अनुमोदन द्यायचे नाही...

**दादाश्री :** हो, म्हणजे ह्याचा अर्थ एवढाच की, 'आपण यात सहमत नाही' असे आम्ही सांगू इच्छितो. अर्थात आपण वेगळे आहोत. आणि हुक्का प्यायचे आपणहून बंद होईल तेव्हा खरे. पण आता आपण त्याला चिकटलेलो नाही, ते आपल्याला चिकटले आहे. त्याचा कालावधी पूर्ण झाला म्हणजे ते सुटेल. असे मला म्हणायचे आहे. एका बाजूला हुक्का पीत असाल आणि एका बाजूला ही भावना बोलाल, तर (हळूहळू) प्यायले ते सर्व उडून जाईल आणि ह्या भावनेची सुरुवात झाली.

लोक म्हणतात, 'या साहेब, या साहेब' पण त्यांच्या मनात काय असते की, 'आता कुठून टपकले?' याउलट हे काय म्हणतात की हुक्का पीत आहे पण 'असे होता कामा नये.' लोक मात्र याचे उलट बोलतात. बाहेर 'या बसा' म्हणतात आणि आत मनात तर 'हे कुठून टपकले?' असे म्हणतात. म्हणजे लोक सुधारलेले बिघडवत आहेत आणि तुम्ही बिघडलेले सुधारत आहात.

**प्रश्नकर्ता :** संपूर्ण 'अक्रम विज्ञानाचे' आश्चर्यच हेच आहे ही की बाहेर बिघडलेले आहे आणि आत सुधारत आहोत.

**दादाश्री :** हो, म्हणूनच आपल्याला संतोष वाटतो ना! की हा तळलेला घाणा बिघडला तर बिघडला पण हा नवीन घाणा मात्र नक्कीच चांगला होईल. एक घाणा बिघडला तो तर गेला, पण नवीन तर चांगला होईल ना? तेव्हा लोक काय म्हणतात? 'हा आहे तोच घाणा सुधारायचा आहे.' अहो, सोडा ना आता, जाऊ द्या, नाही तर नवीनही बिघडून जाईल. त्यांचा तर घाणाही गेला नी तेलही गेले.

**प्रश्नकर्ता :** आज जे बिघडलेले दिसत आहे त्याला आपण जबाबदार नाही. तो तर गेल्या जन्माचा परिणाम आहे.

**दादाश्री :** हो, आज आपण जबाबदार नाही. आज ती सत्ता दुसऱ्याच्या हातात आहे. जबाबदारी आपल्या हातात नाही ना! यात काही

बदल होणार नाही, मग विनाकारण हाय-हाय का करतोस?! पण तिथे तर गुरु महाराजही म्हणतात की, 'जर असे झाले नाही तर तुला येऊ देणार नाही.' तेव्हा तो काय म्हणतो, 'पण साहेब, मला तर करायचेच आहे पण माझ्याने होत नाही, त्याला मी काय करू?' अर्थात समज नसल्यामुळे असे घोटाळे चालत आहेत.

**प्रश्नकर्ता :** हे तर जेव्हा प्रकृती एकदम उलट-पुलट करून टाकते ना, तेव्हा त्याला जबरदस्त सफोकेशन (घुसमट) होत असते.

**दादाश्री :** अरे, ते तर इथपर्यंत होते की पाच-पाच दिवसापर्यंत उपाशी राहतात. अहो, गुन्हा कोणाचा आणि मारता कोणाला! पोटाला कशाला मारता! गुन्हा मनाचा आणि मारतात पोटाला. म्हणतात 'तुला जेवायचे नाही.' मग हा बिचारा काय करील?! शक्ती निघून जाते ना बिचाऱ्याची. त्याने खाल्ले असेल तर दुसरे काही काम तरी करू शकेल ना! म्हणून मग आपले लोक म्हणतात, रेड्याच्या चुकीची शिक्षा गुरख्याला का देतोस? चूक रेड्याची आहे, म्हणजे मनाची आहे त्यात या गुराख्याचा, म्हणजे या बिचाऱ्याचा देहाचा काय गुन्हा?!

आणि बाहेर झाडलोट करून काय फायदा होणार? जे आपल्या सत्तेतच नाही, त्यासाठी विनाकारण बोंबाबोंब करण्यात काय अर्थ? प्रथम आतील सर्व कचरा साफ करावा लागेल, आतील सर्व धुवावे लागेल. हे तर बाहेरून धुतात, गंगेत जातात तरीही देहालाच डुबक्या मारायला लावतात. अरे, देहाला डुबक्या मारून काय सिद्ध होईल? मनाची डुबकी मार ना! मनाला, बुद्धीला, चित्ताला, अहंकाराला, या सर्वांना, संपूर्ण अंत:करणालाच बुडवायचे आहे! शिवाय त्यांनी साबणाचाही कधी वापर केला नाही. मग सर्व बिघडणार की नाही?

वय लहान असेपर्यंत चांगले असते. मग दिवसेंदिवस बिघडत जाते, आणि मग कचरा जमा होतो. म्हणून आम्ही काय सांगतो की

(इथे) तू तुझे आचार बाहेर ठेव आणि ही नऊ कलमे घेऊन जा. हे जे सर्व खोटे आहे ते बाहेर ठेव आणि ही नऊ कलमांची भावना रूजवत जा, तर येणारा पुढचा जन्म उत्तम होईल!

**प्रश्नकर्ता :** ज्यांनी हे 'ज्ञान' प्राप्त केले नसेल ती माणसे सुद्धा अशा प्रकारे आचार परिवर्तन करू शकतात ना?

**दादाश्री :** हो, सगळेच परिवर्तन करू शकतात. सर्वांनाच ही कलमे म्हणण्याची सूट आहे.

**प्रश्नकर्ता :** काही चुकीचे झाले असेल तर नंतर ते धुऊन टाकण्यासाठी ही नऊ कलमे एक जबरदस्त उपाय आहे.

**दादाश्री :** हा तर मोठा पुरुषार्थ आहे. सर्वात महान विज्ञान आम्ही उघड केले आहे. पण लोकांना हे समजले तर पाहिजे ना! म्हणून आम्ही अनिवार्य केले की एवढे तुम्हाला करायचे. जरी समजत नसेल तरी हे (नऊ कलमांचे औषध) पिऊन टाक ना!

**प्रश्नकर्ता :** यामुळे आतील रोग बरे होतील.

**दादाश्री :** हो, रोग बरे होतील. 'दादा' म्हणाले की 'वाचा' म्हणजे फक्त वाचायचे. तरी खूप झाले! हे पचवण्यासाठी नाही. फक्त ही पुडी विरघळून पिऊन टाकायची आणि मग ऐटीत फिरत राहायचे!

**प्रश्नकर्ता :** ही गोष्ट खरी आहे का की भाव केल्याने पात्रता वाढते?

**दादाश्री :** भाव हाच खरा पुरुषार्थ आहे. बाकी सर्व व्यर्थ गोष्टी आहेत. कर्तापद हे बंधनपद आहे आणि हा भाव तर सोडवणारे पद आहे. 'असे करा, तसे करा, अमके करा', त्यामुळेच तर लोक बंधनात अडकले आहेत ना!

## भावना फळेल पुढील जन्मी

**प्रश्नकर्ता :** समजा जर असा प्रसंग घडला की माझ्याकडून कोणाच्या अहंकाराचे प्रमाण दुखावले गेले, तर अशा प्रसंगी मी हे कलम बोलू शकतो का की कुणाच्याही अहम्‌चे प्रमाण दुखावणार नाही...

**दादाश्री :** तेव्हा तर आपण 'चंदुभाऊला' सांगावे लागते की, 'भाऊ प्रतिक्रमण करा, त्याला दुःख झाले त्याबद्दल.' आणि इतर लहानसहान बाबतीत तर झंझट करायचीच नाही. जर अहम् दुखावेल अशी खूप भारी लक्षणे नसतील, पण थोडेसे दुःख झाले असेल तर आपण 'चंदुभाऊ'कडून प्रतिक्रमण करवून घ्यायचे.

ह्या भावना करायच्या आहेत. अजून एक जन्म तर बाकी आहे ना, म्हणून ह्या भावना फळ देतील. तेव्हा तर तुम्ही भावनारूपच होऊन गेला असाल. जशा भावना लिहिल्या आहेत, त्यानुसारच तुमचे वर्तन असेल, पण पुढच्या जन्मी! आताच बीज पेरले आहे आणि तुम्ही म्हणाल की 'चला, आपण आताच खणून (फळ) खाऊन टाकूया.' तर ते चालणार नाही.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे परिणाम ह्या जन्मात नाही, पुढच्या जन्मात येईल ?

**दादाश्री :** हो, अजून एक-दोन जन्म बाकी राहिले आहेत, तेवढ्यासाठी हे बीज टाकत आहोत, त्यामुळे पुढच्या जन्मात सर्व 'क्लिअर (स्वच्छ) होईल.' पण हे तर ज्यांना (चांगले) बीज टाकायचे असेल त्यांच्यासाठी आहे.

**प्रश्नकर्ता :** तर हे निरंतर, म्हणजे जेव्हा जेव्हा व्यवहार येईल त्यानुसार ?

**दादाश्री :** नाही, त्या व्यवहाराला आणि भावनेला काही देणेघेणे

नाही. व्यवहार तर निराधार आहे बिचारा! आणि ही भावना तर आधारी वस्तू आहेत. ह्या भावना तर सोबत येणार आहेत आणि व्यवहार निघून जाईल.

**प्रश्नकर्ता :** पण व्यवहाराच्या आधारेच ही भावना करू शकतो ना?

**दादाश्री :** नाही, यात व्यवहाराचे काही देणेघेणे नाही. ह्या भावनाच सोबत येणार आहे. व्यवहार तर निराधार आहे, तो तर निघून जाईल. कितीही चांगला व्यवहार असेल तोसुद्धा जाणार आहे, कारण तो संयोग जुळून आला आहे. आणि ह्या भावना तर रूजविण्याच्या आहे. त्याचा संयोग जुळून येणे अजून बाकी आहे (पुढच्या जन्मात).

**प्रश्नकर्ता :** पण त्या व्यवहारामुळेच स्वत:चे भाव बदलत असतात, तेव्हा ही भावना वापरून पुन्हा भाव बदलायचे का?

**दादाश्री :** पण त्याचा काहीच उपयोग होणार नाही. पूर्वी जेवढे केले असेल, तेवढेच आता मदत करील. हो, असे होऊ शकते की पूर्वजन्मी थोडेफार केले असेल तरच या जन्मी पूर्णपणे परिवर्तन घडू शकते.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे मागच्या जन्मी केलेल्या भावनेच्या परिणाम स्वरूपच आजचा व्यवहार येतो?

**दादाश्री :** तोच परिणाम येतो. दुसरा येत नाही. भाव म्हणजे बीज आणि द्रव्य म्हणजे परिणाम, कणीस. एक बाजरीचा दाणा टाकला, तर एवढे मोठे कणीस येते.

ही कलमे तर फक्त म्हणायचीच आहेत. रोज भावनाच रूजवायची आहे. हे तर बीज पेरायचे आहे. पेरल्यानंतर जेव्हा फळ येईल तेव्हा पाहा. तोपर्यंत खत घालत राहायचे. बाकी, रोजच्या

व्यवहारात कोणताच बदल करायचा नसतो. आणि हे जे आहे ते जुने होते तेच आहे.

म्हणजे ही नऊ कलमे काय म्हणतात? 'हे दादा भगवान मला शक्ती द्या.' तेव्हा लोक काय म्हणतात? 'ह्या तर पाळता येतील अशा गोष्टी नाहीत.' अरे, पण हे करण्यासाठी नाहीच. मग कशासाठी वेडेपणा करतोस! या जगात सगळेच सांगतात, 'करा, करा, करा.' अहो, करायचे नसतेच, फक्त समजायचेच असते. आणि मग, 'मला असे करायचे नव्हते आणि (हे जे झाले) त्याचा मी पश्चात्ताप करत आहे.' असे म्हणून 'दादा भगवानां'जवळ माफी मागायची. 'मला असे करायचे नाही' असे बोलल्यामुळे तुमचा अभिप्राय वेगळा होऊन गेला. मग जरी करत असाल तरी हरकत नाही. पण अभिप्राय वेगळा पडला म्हणजे सुटलात! हे मोक्षमार्गाचे रहस्य आहे, पण ते जगाच्या लक्षात येत नाही ना!

**प्रश्नकर्ता :** लोक 'डिस्चार्ज' मध्येच बदल करू इच्छितात, परिणामातच बदल व्हावा, असे त्यांना वाटते ना!

**दादाश्री :** हो, म्हणजे लोकांना हे लक्ष्य माहीतच नाही, त्याची समजच नाही. मी त्यांना अभिप्रायापासून मुक्त करू इच्छितो. आता, 'हे चुकीचे आहे' असा तुमचा अभिप्राय बनून गेला आहे. पूर्वी 'हे खरे आहे' असा अभिप्राय होता आणि म्हणून संसार उभा राहिला आणि आता 'हे चुकीचे आहे' असा अभिप्राय झाला, म्हणून मुक्त झाला. मात्र आता हा अभिप्राय पुन्हा कधीही, कुठल्याही परिस्थितीत बदलता कामा नये!

ही नऊ कलमे रोज बोलल्यामुळे मग हळूहळू कोणाबरोबरही भांडण-तंटा राहणार नाही. कारण स्वत:चा भाव संपला आहे. आता जे 'रिॲक्शनरी' (प्रत्याघाती) आहे तेवढाच फक्त बाकी राहिला आहे. तो सुद्धा हळूहळू कमी होत जाईल.

## महात्म्यांसाठी, हे चार्ज की डिस्चार्ज?

**प्रश्नकर्ता :** भाव आणि भावना, यात काय फरक आहे?

**दादाश्री :** या दोन्ही गोष्टी चंदुभाऊत येतात! पण तुमचे म्हणणे खरे आहे. भाव आणि भावना यात फरक आहे.

**प्रश्नकर्ता :** भावना पवित्र असते आणि भाव चांगलाही असू शकतो आणि वाईटही असू शकतो.

**दादाश्री :** नाही, भावना पवित्र असते असे नाही. भावनासुद्धा अपवित्र असू शकते. कोणाचे घर जाळून टाकण्याची भावना होते आणि कोणाचे घर बांधून देण्याचीही भावना होते. म्हणजे भावना दोन्हीकडे वापरली जाते, पण भाव हे चार्ज आहेत आणि भावना ही डिस्चार्ज आहे.

आपल्याला जे आत होत असते की मला असे करण्याचे भाव होतात, मला असे करावेसे वाटते, ती पण भावनाच आहे भाव नाहीत. खरे तर जे चार्ज होतात ते भाव आहेत.

म्हणजे भावकर्मामुळे हे जग उभे राहिले आहे. आपल्याकडून जर एखादे कार्य झाले नाही, तरी पण भाव तसाच ठेवायचा. आपल्याकडे (अक्रम मार्गात) भावकर्म (चार्ज) घालवून टाकले आहे. बाहेरच्या लोकांनी भावकर्म केले पाहिजे. अर्थात शक्ती मागितली पाहिजे. ज्याला जी हवी असेल ती शक्ती दादा भगवानांजवळ मागितली पाहिजे.

**प्रश्नकर्ता :** बाहेरच्या जगातील जे लोक आहेत, त्यांनी ही शक्ती मागितली पाहिजे, तर मग आपले (ज्ञान घेतलेले) महात्मा शक्ती मागतात, भावना करतात त्याला काय म्हटले जाईल?

**दादाश्री :** महात्मा मागतात, ते त्यांच्या डिस्चार्जमध्ये आहे. कारण भावना दोन प्रकारच्या आहेत, चार्ज आणि डिस्चार्ज दोन्ही प्रकारच्या.

जगाच्या व्यवहारात लोकांनासुद्धा भावना असतात आणि इथे आपल्यासुद्धा भावना असतात. पण आपल्या भावना डिस्चार्जरूपाने आहेत. आणि त्यांना डिस्चार्ज आणि चार्ज दोन्ही रूपात भावना असतात. पण शक्ती मागण्यात आपले काय नुकसान आहे?

**प्रश्नकर्ता :** बाहेरचे लोक नऊ कलमांची शक्ती मागतात त्याला भाव म्हणतात तर मग महात्मा शक्ती मागतात त्याला भाव नाही म्हणायचे का?

**दादाश्री :** बाहेरच्या लोकांसाठी ते भाव म्हणायचे आणि आपल्या महात्मांसाठी ती भावना. तुमचे म्हणणे बरोबर आहे. त्यांच्यासाठी भाव म्हणायचे, चार्ज म्हणायचे. आणि महात्म्यांसाठी हे डिस्चार्ज आहे, त्याला भाव म्हणत नाहीत!

## भाव, एक्झॅक्ट डिजाईनपूर्वक!

**प्रश्नकर्ता :** या नऊ कलमांमध्ये जसे सांगितलेले आहे नेहमी तशाच आमच्या भावना आहेत, इच्छा आहे, सर्वच आहे, अभिप्राय पण आहे.

**दादाश्री :** तुम्हाला असे वाटते खरे की मी नेहमी असेच करत होतो पण वास्तवात तसे नसते. ह्या बाजूला कल आहे ही गोष्ट नक्की, पण तो कल निश्चितपणे अशा प्रकारे असला पाहिजे. डिजाईनपूर्वक असले पाहिजे. कल तर असतो, साधू-संन्यासींना त्रास न देण्याची इच्छा तर असतेच ना! पण ते डिजाईनपूर्वक असले पाहिजे.

**प्रश्नकर्ता :** डिजाईनपूर्वक म्हणजे कशा प्रकारे दादाजी?

**दादाश्री :** त्यात जसे लिहिले आहे त्याप्रमाणे, एक्झॅक्टनेस (यथार्थपणे). नाही तर मला साधू-संतांना त्रास द्यायचा नाही, असे तर मनात असतेच, पण तरीसुद्धा त्यांना त्रास दिलाच जातो. त्याचे कारण

काय? तर त्यांचे डिजाईनपूर्वक नाही. ते जर डिजाईनपूर्वक असेल तर असे घडणार नाही.

**प्रश्नकर्ता :** ही जी नऊ कलमे आहेत ती समजपूर्वक जीवनात आणली पाहिजेत?

**दादाश्री :** नाही, तसे समजपूर्वक आणली पाहिजे असे काही नाही. आम्ही काय सांगतो की, हे आम्ही जे बोललो आहोत ती शक्ती फक्त मागा. ती शक्तीच तुम्हाला एक्झॅक्टनेसमध्ये आणून ठेवेल. तुम्हाला समजपूर्वक करायचे नसते. आणि तसे होणारही नाही. मनुष्याकडून समजपूर्वक होणारच नाही. जर समजून करायला जाईल तर होणार नाही. निसर्गाला सोपवून द्यायचे.म्हणून 'हे दादा भगवान शक्ती द्या.' शक्ती इटसेल्फ उगेल. नंतर मग एक्झॅक्ट येईल.

खूप उच्च कोटीची वस्तू आहे ही. परंतु जोपर्यंत समजत नाही तोपर्यंत सगळे असेच!

मी कशासाठी बोललो असेल की शक्ती मागा, शक्ती द्या असे? कारण स्वत: डिजाईन करू शकत नाही. मूळ डिजाईन कसे बनवू शकेल? अर्थात आज हा इफेक्ट (परिणाम) आहे. ही जी शक्ती मागत आहोत ते कॉज (कारण) आहे आणि नंतर त्याचा इफेक्ट येईल. पण तो इफेक्ट कोणा मार्फत येतो? तर दादा भगवानांच्या मार्फत योजिले आहे. इफेक्ट भगवानांच्या मार्फत आला पाहिजे.

म्हणून नऊ कलमांप्रमाणे शक्ती मागतच राहिले तर आपोआपच नंतर नऊ कलमांमध्ये राहिले जाईल, काही वर्षानंतर.

## जगाच्या संबंधातून सूटण्यासाठी...

**प्रश्नकर्ता :** ही जी नऊ कलमे दिली आहेत ती विचार, वाणी आणि वर्तन यांच्या शुद्धतेसाठी दिली आहेत ना?

**दादाश्री :** नाही, नाही. यात त्याची गरजच नाही. अक्रम मार्गात याची गरजच नाही. ही नऊ कलमे तर अनंत जन्मांपासूनचा सर्वांसोबतचा तुमचा जो सर्व हिशोब बांधला गेला आहे त्या हिशोबातून मुक्त होण्यासाठी दिली आहेत. तुमचे वहीखाते चोख करण्यासाठी दिली आहेत.

ही नऊ कलमे बोलल्यामुळे लोकांशी बांधलेल्या तारा सुटतील. लोकांच्याबरोबर ज्या ऋणानुबंधाच्या तारी बांधलेल्या आहेत त्या ऋणानुबंधामुळे तुमचा मोक्ष अडकून राहिला आहे. म्हणून या ऋणानुबंधापासून सुटण्यासाठी ही नऊ कलमे आहेत.

हे बोललात म्हणजे तुमचे आतापर्यंतचे जे दोष होऊन गेलेत ते सगळे सैल होऊन जातील. आणि मग त्याचा परिणाम तर येणारच. सर्व दोष जळालेल्या दोरीसारखे होऊन जातात, ते मग असा जरासा हात लावल्याबरोबरच गळून पडतील.

**प्रश्नकर्ता :** दोषांचे प्रतिक्रमण करण्यासाठी आम्ही नऊ कलमे रोज बोलत राहिलो तर त्याने शक्ती मिळेल का?

**दादाश्री :** नऊ कलमे बोलणे हे वेगळे आहे आणि दोषांचे प्रतिक्रमण करणे हे वेगळे आहे. जे दोष होतील त्याचे प्रतिक्रमण तर रोजच करायला पाहिजे.

अनंत जन्मांपासून लोकांबरोबर जी खिटपीट (राग-द्वेष) झाली असेल ते सर्व ऋणानुबंध ही नऊ कलमे बोलल्यामुळे सुटतील. हे प्रतिक्रमण आहे, सर्वात मोठे प्रतिक्रमण आहे. या नऊ कलमांमध्ये संपूर्ण जगाचे प्रतिक्रमण येऊन जाते. तेव्हा हे चांगल्या प्रकारे करा. आम्ही तुम्हाला दाखवून देतो, मग आम्ही आमच्या देशात (मोक्षाला) निघून जाणार ना!

## वर्तली नऊ कलमे दादांना जीवनभर!

असे आहे की ह्या काळानुसार लोकांमध्ये एवढी शक्ती नाही. जेवढी शक्ती आहे तेवढेच दिले आहे. एवढी भावना भावेल, त्यांचा पुढच्या जन्मात मनुष्यत्व जाणार नाही याची गॅरंटी मी देतो. नाहीतर आज ऐंशी टक्के मनुष्यत्व उरणारच नाही असे होऊन गेले आहे.

आपली ही नऊ कलमे आहेत ना, यात सर्वोत्तम भावना आहेत. यात संपूर्ण सार सामावला आहे. ही नऊ कलमे आम्ही संपूर्ण आयुष्यभर पाळत आलो आहोत, तर ही पूंजी आहे आमची. अर्थात हा माझा रोजचा माल आहे, तो शेवटी मी जाहिर केला, लोकांचे कल्याण होवो यासाठी. कितीतरी वर्षांपासून, चाळीस चाळीस वर्षांपासून निरंतर ही नऊ कलमे आमच्या आतमध्ये चालतच आहेत. तेच आता लोकांसाठी मी उघड केले.

**प्रश्नकर्ता :** आज तर आम्ही 'हे दादा भगवान मला शक्ती द्या' असे करून बोलत आहेत, पण दादाजी आपण ही नऊ कलमे कोणाला उद्देशून म्हणत होता?

**दादाश्री :** 'दादा भगवान' हे नाव नसेल, तर दुसरे कोणते नाव असेल. पण नाव तर असेलच. त्यांनाच उद्देशून म्हणत होतो. मग ते शुद्धात्मा म्हणा की जे काही म्हणा ते. हे त्यांनाच उद्देशून म्हणत होतो.

क्रमिक मार्गाची एवढी मोठी शास्त्रे वाचली, किंवा मग फक्त ही नऊ कलमे जरी बोललीत तरी खूप झाले! नऊ कलमांमध्ये तर गजब शक्ती ठेवली आहे. गजब शक्ती आहे पण ती समजत नाही ना! हे तर आम्ही समजावतो तेव्हा समजते. आणि ह्याची किंमत समजली आहे असे मी त्यालाच म्हणेन की जो मला येऊन सांगेल की, 'ही नऊ

कलमे मला खूप आवडली.' आणि समजण्यासारखी आहेत ही नऊ कलमे.

ही नऊ कलमे शास्त्रात नाहीत. पण आम्ही जे पाळत आहोत आणि जी कायम आमच्या अमलातच आहेत, तीच तुम्हाला करण्यासाठी देत आहोत. आम्ही ज्या प्रकारे वागतो त्याचप्रकारे ही नऊ कलमे लिहिली आहेत. या नऊ कलमांनुसार आमचे वर्तन असते, पण तरीही आम्ही भगवान गणले जात नाही. भगवान तर, आतमध्ये जे भगवान आहेत तेच! बाकी, कुठलाही मनुष्य असे वर्तन करू शकत नाही.

एवढ्यात 'चौदालोका'चे सार आहे. ही नऊ कलमे लिहिली आहेत त्यात 'चौदालोका'चे सार आहे. संपूर्ण 'चौदालोका'चे जे दही आहे त्याला घुसळून मी हे लोणी काढून ठेवले आहे. म्हणजे हे सर्व किती पुण्यशाली आहेत की (अक्रम मार्गच्या) लिफ्ट मध्ये बसल्याबसल्या मोक्षाला जात आहेत. हो, हात मात्र बाहेर काढायचा नाही, एवढीच अट!

अशी ही नऊ कलमे तर कुठेही असू शकत नाही. नऊ कलमे तर पूर्ण पुरुषच लिहू शकतात. पण (एरवी) ते नसतातच ना, ते जर असतील तर लोकांचे कल्याणच होऊन जाईल.

## वीतराग विज्ञानाचे सार

आणि ही भावना करताना कसे असायला पाहिजे? वाचताना शब्दन् शब्द दिसला पाहिजे. 'तुम्ही वाचत आहात' असे जर तुम्हाला 'दिसले' तर मग तुम्ही दुसऱ्या जागी गुंतलेले नाहीत. ही भावना भावते वेळी तुम्ही दुसऱ्या जागी गुंतलेले नसावे. आम्ही एक क्षण देखील दुसऱ्या जागी जात नाही. त्याच मार्गावर तुम्हालासुद्धा यावे लागेल ना? ज्या जागेवर आम्ही आहोत तिथेच! ही भावना भावल्याने तुम्ही पूर्ण होत जाल. भावना तर एवढीच करण्यासारखी आहे.

हो, मन-वचन-कायेच्या एकतेने बोलाल तीच भावना. म्हणून हे अवश्य करा. आता ही नऊ कलमे तर तुम्ही अवश्य करा. संपूर्ण वीतराग विज्ञानाचे सार आहे ही नऊ कलमे! आणि प्रतिक्रमण-प्रत्याख्यान सर्वच यात येऊन गेले. अशी ही कलमे कुठेही निघालेली नाहीत. जसे हे ब्रह्मचर्यचे पुस्तक निघाले नाही, तसेच ही नऊ कलमेसुद्धा निघाली नाहीत. नऊ कलमे जर वाचली ना, ही भावना जर भावली ना, तर दुनियेत कोणाशीही ही वैरभाव राहणार नाही, सर्वांसोबत मैत्री होईल. ही नऊ कलमे तर सर्व शास्त्रांचे सार आहे.

**जय सच्चिदानंद**

# संपर्क सूत्र

## दादा भगवान परिवार

**अडालज** : **त्रिमंदिर**, सीमंधर सिटी, अहमदाबाद-कलोल हाईवे,
पोस्ट : अडालज, जि.-गांधीनगर, गुजरात - 382421
**फोन** : +91 79 3500 2100, +91 9328661166/77
E-mail : info@dadabhagwan.org

**मुंबई** : **त्रिमंदिर,** ऋषिवन, काजुपाडा, बोरिवली (E)
फोन : 9323528901

| | | | |
|---|---|---|---|
| **दिल्ली** | 9810098564 | **बेंगलूर** | 9590979099 |
| **कोलकता** | 9830093230 | **हैदराबाद** | 9885058771 |
| **चेन्नई** | 7200740000 | **पूणे** | 7218473468 |
| **जयपुर** | 8890357990 | **जलंधर** | 9814063043 |
| **भोपाल** | 6354602399 | **चंडीगढ** | 9780732237 |
| **इन्दौर** | 6354602400 | **कानपुर** | 9452525981 |
| **रायपुर** | 9329644433 | **सांगली** | 9423870798 |
| **पटना** | 7352723132 | **भुवनेश्वर** | 8763073111 |
| **अमरावती** | 9422915064 | **वाराणसी** | 9795228541 |

**U.S.A.** : **DBVI Tel. :** +1 877-505-DADA (3232),
**Email :** info@us.dadabhagwan.org

**U.K.** : +44 330-111-DADA (3232)

**Kenya** : +254 759-92-DADA (3232)

**UAE** : +971 557316937

**Dubai** : +971 501364530

**Australia** : +61 402179706

**New Zealand** : +64 21 0376434

**Singapore** : +65 91457800

**www.dadabhagwan.org**

## सार, सर्व शास्त्रांचे

क्रमिक मार्गाची एवढी मोठी शास्त्रे वाचली किंवा मग फक्त ही नऊ कलमे जरी बोलली तरी खूप झाले ! ह्या नऊ कलमांमध्ये एवढी गजब शक्ती आहे ! ही नऊ कलमे शास्त्रांमध्ये नाहीत, परंतु आमच्या जीवनात आम्ही ज्या भावनांचे पालन करत आहोत आणि ज्या नेहमी आमच्या वर्तनातच आहेत त्याच तुम्हाला करण्यासाठी देत आहोत. म्हणून तुम्ही ही नऊ कलमे अवश्य बोला. ही नऊ कलमे म्हणजे संपूर्ण वीतराग विज्ञानाचे सार आहे.

**– दादाश्री**

dadabhagwan.org

ISBN 978-93-82128-38-0

Printed in India

Price ₹20